सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २२६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ८ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## शिवसेना पक्ष, चिन्हाचा खटला पुन्हा लांबणीवर

### पुढील सुनावणी १२ नोव्हेंबरला होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८नवी दिल्ली**

शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत आज अंतिम सुनावणी सुप्रीम कोर्टात पार पडणार होती. मात्र आजची ही सुनावणी १ महिना पुढे ढकलण्यात आली आहे. या प्रकरणी आता पुढील सुनावणी १२ नोव्हेंबरला होणार आहे.

न्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर हा खटला सुनावणीसाठी येणार होता. परंतु सशस्त्र दलाच्या महत्त्वाच्या सुनावणीमुळे न्या. सूर्यकांत यांना आज शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत सुनावणी पुरेसा वेळ मिळणार नव्हता. त्यामुळे आज न्यायाधीशांसमोर उद्धव ठाकरे यांच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीचा हवाला देत नजीकची तारीख देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. मात्र एकनाथ शिंदे यांच्या वकिलांकडून डिसेंबरमधील तारीख देण्याची मागणी करण्यात आली. या प्रकरणी दोन्ही बाजूचे ऐकल्यानंतर न्यायाधीशांनी १२ नोव्हेंबरची तारीख दिली. या खटल्यावर १२ नोव्हेंबरला सुनावणी करूया असं कोर्टाने म्हटलं.



आजच्या सुनावणीत कोर्टाने कपिल सिब्बल यांना अंतिम युक्तिवाद करण्यासाठी तुम्हाला किती कालावधी लागेल असं विचारले असता मला ४५ मिनिटे पुरेशी आहेत असं सिब्बल यांनी उत्तर दिले. शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत आज अंतिम सुनावणी होऊन निकाल हाती लागेल असं अपेक्षित होते परंतु सशस्त्र दलाशी निगडीत महत्त्वाचा खटला कोर्टासमोर आहे. यावर सविस्तर सुनावणी कोर्ट घेणार आहे. त्यामुळे शिवसेनेची संबंधित याचिका पुढे ढकलण्यात आली आहे.

**कपिल सिब्बल काय म्हणाले ?**

शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबतच्या खटल्यात उद्धव ठाकरे यांच्या बाजूने कपिल सिब्बल कोर्टात बाजू मांडत आहेत. आज कोर्टासमोर सिब्बल म्हणाले की, साधारणपणे जानेवारी महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असतील. त्यापूर्वी आम्हाला सुनावणी होणे आवश्य आहे. त्यामुळे कोर्टाकडून शक्य तितक्या लवकरची तारीख द्यावी, जेणेकरून अंतिम युक्तिवाद पूर्ण होईल अशी मागणी केली. तर एकनाथ शिंदे यांच्या वकिलांकडून ही तारीख आणखी लांबवण्याचा प्रयत्न केला गेला. न्या. सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोरच शिवसेना चिन्ह आणि नावाचा खटला सुरू आहे. १९ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या काळात राष्ट्रपती आणि राज्यपाल वादावर घटनापीठाची सुनावणी होणार होती त्यामुळे हा खटला लांबणीवर पडला होता. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील काही महिन्यात पार पडतील. त्याआधीच खरी शिवसेना कुणाची हा निकाल सुप्रीम कोर्ट द्यावा असा ठाकरे गटाचा प्रयत्न आहे.

## जागावाटपावरून काँग्रेसमध्ये पेच

### तेजस्वी यादव यांच्या मुख्यमंत्रिपदाबाबतही एकमत नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८पाटणा**

बिहारमध्ये विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. काल निवडणूक आयोगाने निवडणुकीची घोषणा केली. तर दुसरीकडे राजकीय पक्षांनी उमेदवारांच्या चाचपणीला सुरूवात केली आहे. बिहार महाआघाडीमध्ये जागावाटप आणि नेतृत्वावरून वाद सुरूच आहेत. काँग्रेस अधिक जागांची मागणी करत आहे, तर राजद जागांवर ठाम आहे. नेतृत्वाबाबत एकमतही अपयशी ठरत आहे, यामुळे आघाडीतीचे एकमत होत नाही.

महाआघाडीतील हा वाद कोणत्याही एका पक्षाचा नाही, तर त्यांच्या सर्व मित्रपक्षांचा आहे. काँग्रेस त्यांच्या पूर्वीच्या स्ट्राईक रेटकडे दुर्लक्ष करून अधिक जागांची मागणी करत आहे. सीपीआय आणि विकासशील इंसान पार्टी देखील अधिक जागांच्या मागणीवर ठाम आहेत.

महाआघाडीचा मुख्य मित्रपक्ष, राजद, घटक पक्षांच्या या मागणीशी सहमत नाही. जर स्थानिक पातळीवर चर्चा झाली



असती तर हा वाद लगेचच मिटला असता. यावेळी काँग्रेस हायकमांड मित्रपक्ष म्हणून नव्हे तर समान भागीदार म्हणून निवडणूक लढवण्याच्या विचारात आहे.

जागांची चर्चा सुरू होताच काँग्रेसने राजदकडून ७०-७५ जागांची मागणी केली. तर राजद काँग्रेसला जास्तीत जास्त ५०-५५ जागा देण्यास तयार आहे. या जागांच्या संख्येवर चर्चा पुढे सरकली, पण आता काँग्रेसने मित्रपक्षाला दुसरी यादी सादर केली आहे. जर जुन्या आणि नवीन यादी एकत्र केल्या तर जागांची संख्या ७०-७५ पर्यंत पोहोचते. जागावाटपात आणखी गोंधळ वाढण्याची शक्यता आहे.

२०१५ आणि २०२० च्या निवडणुकांचा हवाला देत राजदने वारंवार पक्षाला जास्तीत जास्त ५० किंवा ५२ जागा नाकारल्या आहेत. २०१५ च्या निवडणुकीत काँग्रेसने ४१ जागा लढवल्या आणि २७ जागा जिंकल्या. २०२० मध्ये ७० जागा लढवूनही त्यांना फक्त १९ जागा मिळाल्या.

असे असूनही यावेळी पक्ष संघटनात्मकदृष्ट्या मजबूत झाला आहे आणि त्यांच्या नेत्यांचे ग्राउंड नेटवर्क सुधारले आहे, असा दावा नेतृत्वाने केला आहे.

## नरेंद्र मोदींच्या हस्ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन

### लवकरच प्रवासी सेवा सुरु होणार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८मुंबई**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन पार पडलं आहे. नरेंद्र मोदी यांचं विमान नवी मुंबई विमानतळावर दाखल झालं, त्यानंतर त्यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उद्योजक गौतम अदानी उपस्थित होते. नवी मुंबई विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन मोदींनी केलं.

या विमानतळाची उभारणी चार टप्प्यात होणार आहे. या विमानतळावरुन प्रवासी वाहतूक आणि कार्गो वाहतुकीसाठी दोन महिन्यांचा वेळ लागू शकतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन करण्यापूर्वी विमानतळाच्या कामासंदर्भातील माहिती जाणून घेतली. मोदींनी आज टर्मिनल १ आणि रनवे १ चं काम पूर्ण झालंय त्याचं उद्घाटन मोदी यांनी केलं. पुढच्या टप्प्यात विमानतळाचं काम कसं होणार हे जाणून घेतली. आंतरराष्ट्रीय दर्जाचं मुंबई जवळील दुसरं विमानतळ म्हणून नवी मुंबई विमानतळ ओळखलं जाईल.

नवी मुंबई विमानतळावर चार टर्मिनलची उभारणी होणार आहे. पहिल्या टर्मिनलच्या उद्घाटनाला ७ वर्षांचा कालावधी लागलेला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची उभारणी अदानी समुह आणि सिडको यांच्याकडून संयुक्तपणे उभारलं जात आहे. अदानी समुहाकडे या विमानतळाची ७४ टक्के मालकी आहे. तर, सिडकोकडे २६ टक्के मालकी आहे. अदानी समुहानं २०२१ नं विमानतळ निर्माणामध्ये प्रवेश केला. पुढचा टप्पा दोन्ही संस्थांमार्फत होणार आहे. २०१८ ला भूमिपूजन झालं त्यानंतर जमीन अधिग्रहण करुन विमानतळ उभारणं मोठं आव्हान होतं. ते काम पूर्ण झालं आहे. टर्मिनल १ पूर्ण झाल्यानंतर आता डिसेंबर महिन्यात प्रवासी या विमानतळावरुन प्रवास करु शकतात.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे आशियातील सर्वात मोठं विमानतळ म्हणून याकडे पाहिलं जातंय. या विमानतळाला दि. बा. पाटील यांचं नाव देण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबतचा प्रस्ताव केंद्राकडे देण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींसोबत चर्चा केली होती. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या भाषणात नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचं नाव देण्यासंदर्भात घोषणा करतात याकडे लक्ष लागलं आहे.

## गाड्यांमधून स्फोटक फटाक्यांची वाहतूक संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष : बेफिकरीमुळे घडू शकतो अनर्थ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

गाड्यांमधून स्फोटक आणि ज्वलनशिल चिजवस्तूंच्या वाहतुकीवर प्रतिबंध असताना देखिल रेल्वे गाड्या, बसेस आणि अन्य वाहनांमधून सर्रास फटाक्यांची वाहतूक होत असल्याची धक्कादायक माहिती आहे. विशेष म्हणजे, कारवाईचा अधिकार असणाऱ्या मंडळीकडून या धोकादायक प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याने अनर्थ होण्याची भिती व्यक्त होत आहे.



रेल्वे गाड्या, बसेस किंवा दुसऱ्या कोणत्याही सार्वजनिक परिवहनाच्या माध्यमातून स्फोटक आणि ज्वलनशिल चिजवस्तूंची वाहतूक करण्यास सक्त मनाई आहे. रेल्वे गाड्यांमध्ये बारूद, फटाके किंवा कोणत्याच प्रकारची स्फोटके, सिलिंडर, पेट्रोल अथवा रॉकेल तसेच स्टोव्हची वाहतूक करणारावर रेल्वे ॲक्टच्या कलम १६४ अन्वये कडक कारवाई केली जाते. मात्र, असे असूनही रेल्वे गाड्यांमध्ये अनेक जण लपून छपून स्फोटकांची, फटाक्यांची तसेच प्रतिबंधित चिजवस्तूंची वाहतूक करतात. त्यांच्या या धोकादायक कृतीमुळे रेल्वे गाड्यांमध्ये आग लागून स्फोट घडल्याच्याही घटना यापूर्वी घडल्या आहेत. त्यामुळे अनेकांच्या जानमालाची हानी झाली आहे. मात्र, तरीदेखिल अनेक समाजकंटक तसेच बेजबाबदार मंडळी गाड्यांमधून लपून छपून अशा धोकादायक पदार्थांची, चिजवस्तूंची वाहतूक करतात.

दिवाळीच्या दिवसांत मोठ्या प्रमाणात फटाके फोडून आतिषबाजी केली जात असल्याने प्रदुषण वाढते. त्यामुळे अनेकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. त्यामुळे सामाजिक संस्था, संघटना फटाके न फोडता पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन करतात. घरची जाणकार मंडळीही फटाक्यास मनाई करतात. मात्र, कितीही मनाई केली किंवा आवाहन केले तरी दरवर्षी दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके उडवले जातात. त्यामुळे अनेक ठिकाणी आगी लागतात आणि अनेकांना भाजल्यामुळे दुखापतही होते. आता दिवाळी तोंडावर आहे. त्यामुळे अनेक फटाके विक्रेते मोठ्या शहरातून फटाके विकत घेऊन आपल्या गावात नेऊन विकतात. ही मंडळी फटाक्यांची वाहतूक करण्यासाठी चक्क रेल्वे गाड्या, बस, ट्रॅव्हल्सचा बेमालूमपणे वापर करीत आहे.

**पिशव्या आणि बॅगमध्ये फटाके**

छोट्या-मोठ्या पिशव्या आणि बॅगमधून फटाक्यांची वाहतुक केली जाते. मोठ्या शहरातील रेल्वे स्थानकावर पकडले जाण्याचा धोका असल्याने ही मंडळी छोट्या, आडवळणाच्या ठिकाणी उतरतात आणि मागच्या भागाने निघून जातात. बस आणि ट्रॅव्हल्ससह ऑटो तसेच दुसऱ्या काही वाहनांचाही फटाक्याच्या वाहतुकीसाठी वापर केला जात आहे. संबंधित मंडळीचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने एखादवेळी मोठा धोका होण्याची भिती व्यक्त होत आहे.

## पुणे शहरात रात्री १० नंतर फटाके वाजवण्यास बंदी; नियमावली जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८पुणे**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहरातील फटाके विक्री स्टॉल आणि फटाके वाजवण्याबाबत पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी नियमावली जाहीर केली अहे. त्यानुसार रात्री दहा ते सकाळी सहा या वेळेत फटाके वाजवण्यास बंदी घालण्यात आली आहे. पोलिसांचे आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

फटाके वाजवण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने नियमावली आखून दिली आहे. ध्वनी आणि वायू प्रदूषण टाळण्यासाठी नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार रात्री दहा ते सकाळी सहा या वेळेत फटाके वाजवण्यास बंदी घालण्यात आली आहे. पोलिसांच्या नियमांनुसार मोठा आवाज करणारे 'टमबॉम्ब' वाजवणे, बाळगणे, तसेच विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. शहरातील रुग्णालये, तसेच शैक्षणिक संस्था, न्यायालयाच्या १०० मीटर परिसरात शांतता क्षेत्र आहे. या भागात दिवसा आणि रात्री फटाके वाजवण्यास बंदी घालण्यात आली आहे, असे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी आदेशात म्हटले आहे.

फटाके विक्रेत्यांनी नियमावलीचे पालन करणे गरजेचे आहे. पुणे शहर परिसरात २० ते २४ ऑक्टोबर या कालवधीत तात्पुरत्या स्वरुपात फटाके विक्री करण्यास परवानगी देण्यात आली आहे. महामार्गावर, पुलावर फटाके वाजवणे, अग्निबाण (रॉकेट) उडवण्यास बंदी घालण्यात आली आहे. फटाक्यांच्या आवाजाची मर्यादा १२५ डेसिबलपेक्षा जास्त नसावी, नियमावलीचे पालन करणे बंधनकारक आहे. नियमावलीचे पालन न केल्यास कारवाई करण्याचा इशारा पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.

## दिवाळीसाठी चक्क साखरेने भरलेला ट्रकच नेला चोरून; चोरटा पोलिसांच्या ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८नागपूर**

स्वतःची दिवाळी चांगली साजरी करता यावी, तसेच शौक पूर्ण करण्यासाठी चोरट्याने दिवाळीच्या तोंडावर चक्क १३५ पोते साखरेचा ट्रकच चोरी करून नेला होता. मात्र पोलिसांनी या चोरट्याला लागलीच अटक केली आहे. त्यामुळे चोरट्याला आता दिवाळी मात्र कारागृहात साजरी करावी लागणार आहे.



नागपूर शहरात घडलेल्या या चोरीच्या प्रकरणात पोलिसांनी केलेल्या कारवाईत ऋषभ इवनाते असे चोरट्याचे नाव आहे. दरम्यान तक्रारदार धीरज रेहपाडे राहुल ले-आऊट वडधामना हे कार्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीत सुपरवायजर आहेत. कंपनीचा ट्रक चालक जितू वर्मा याने ट्रकमध्ये १५ लाख रुपयांचे साखरेचे पोत्याचा माल भरला होता. यानंतर रात्री दहाच्या सुमारास वर्माने ट्रक काटोल नाका चौकात उभा केला. त्यानंतर तो घरी गेला होता.

दरम्यान आरोपी ऋषभ याने ट्रकच्या जवळपास कोणी नसल्याची संधी साधून साखरेचा माल भरलेला ट्रक चोरून नेला. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजेच्या सुमारास वर्मा हा घटनास्थळी आला असता त्याला ट्रक दिसून आला नाही. ही माहिती त्याने रेहपाडे यांना दिली. यानंतर रेहपाडे यांनी पोलिसात जात घडल्या प्रकारची माहिती दिली. त्यांच्या तक्रारीवरून गिट्टीखदान पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

**५० लाखाचा मुद्देमाल जप्त**

तक्रार दाखल झायननंतर पोलिसांनी तांत्रिकदृष्ट्या तपास करून ऋषभ यास ताब्यात घेतले. तर त्याची सखोल चौकशी केली असता त्याने ट्रक चोरी केल्याची कबुली दिली. यानंतर पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून ट्रक तसेच साखरेचे पोते असा एकूण ५० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चोरट्याला पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

## पंतप्रधानांचा हात लागतो त्याचे सोने होते, नरेंद्र मोदी हे विकासाची आंधी: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८नवी मुंबई**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे महाराष्ट्रात मोठे प्रकल्प उभे राहत आहेत. पंतप्रधान मोदींचे हात देणारे आहेत. काँग्रेस आघाडीसारखे भ्रष्टाचार करून ओरबाडणारे नाही. काँग्रेसचे करप्शन फर्स्ट आणि मोदी यांचे नेशन फर्स्ट हा फरक आहे. मोदी हे विकासाची आंधी आहेत, असे कौतुकोद्गार महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळा उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. यावेळी एकनाथ शिंदे बोलत होते.



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-१ चे उद्घाटन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, उद्योजक गौतम अदानी यांच्यासह अनेक मंत्री, नेते उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा महाराष्ट्रात येतात तेव्हा मोठ्या प्रकल्पांचे भूमिपूजन आणि लोकार्पण आपण करतो. आठ वर्षांपूर्वी पंतप्रधान मोदींच्या हस्ते भूमिपूजन झाले होते, त्याचे आज लोकार्पण होते आहे. मोदींचा हात लागतो त्या गोष्टीचे सोने होते हे आपण पाहतो, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

२०१४ मध्ये पंतप्रधान मोदी यांनी टेक ऑफ केले, ते भारताला महासत्ता करण्यासाठी आहे. प्रगती आणि विकास याबरोबरच येतात. उड्डाण म्हटले की आम्हाला मोदी आठवतात. मी आज आपल्याला हा विश्वास देऊ इच्छितो की, या एअरपोर्टची तुलना लंडनच्या हिथ्रो विमानतळाशी केली जात आहेत. पण लवकरच लंडनचे लोक हिथ्रोची तुलना नवी मुंबईशी करतील, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

## संपादकीय ......

# बिहारची रणधुमाळी

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या घोषणेसह बिहारमध्ये पुन्हा लोकशाहीचा भव्य उत्सव सुरू झाला. यावेळी विधानसभेच्या निवडणुका केवळ दोन टप्प्यांत होणार आहेत. बिहारसाठी ही सामान्य बाब नाही. एकेकाळी मतदान बूथवर ताबा मिळवणे आणि ‘मसल पॉलिटिक्स’साठी ओळखले जाणारे हे राज्य आता शिस्त आणि विश्वासाचे प्रतीक बनताना दिसत आहे. तेथील निवडणूक शिस्त, विश्वास आणि मतदारांच्या सहभागाचा उत्सव असेल, अशी आशा आहे. हे तेच राज्य आहे ज्याने जयप्रकाश नारायण यांच्या आवाहनावर हुकूमशाहीला पराभूत केले आणि महात्मा गांधी यांना चंपारण्य दिले. संपूर्ण देशाला शिकवले की, लोकशाही केवळ मतदानाचा अधिकार बजावण्यापुरती मर्यादित नाही, तर लोकशाहीने दिलेल्या अधिकाराबद्दलचीही आहे.बिहारमध्ये केवळ राजकारण केले जात नाही, तर ते जगले जाते. बिहार आर्थिकदृष्ट्या मागासलेले मानले जाऊ शकते; पण राजकीयदृष्ट्या ते सर्वात परिपक्व राज्य आहे. त्याच्या मातीतून क्रांतीचा वास येतो. ही तीच भूमी आहे, जिथे ब्रिटिशांविरुद्ध पहिला लढा दिला गेला, जयप्रकाश नारायण यांना ‘लोकनायक’ बनवले गेले. तेथे लोकशाही ही केवळ एक व्यवस्था नाही, ती एक जीवनशैली आहे. ही निवडणूक फक्त सत्तेबद्दल नाही, तर विचारांबद्दलही आहे. बिहार जातीच्या समीकरणांच्या पलीकडे जाईल का? तरुण जातीपेक्षा रोजगार आणि शिक्षणाला प्राधान्य देतील का? यावेळी महिला निर्णायक भूमिका बजावतील का, हे प्रश्न या राज्याच्या प्रत्येक गावात आणि चौकात प्रतिध्वनीत होत आहेत. यावेळी लढाई चुरशीची आणि अटीतटीची आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) आणि इंडिया आघाडीमधील लढाई जुनी आहे; मात्र आता संदर्भ बदलले आहेत. दिल्लीच्या राजकारणाशी बिहारची केली जाणारी तुलना चुकीची आहे.दिल्ली आणि बिहार ही दोन वेगळी राज्ये आहेत. दिल्लीत राजकारण विचारांनी, तर तेथे भावनांनी चालते. दिल्लीत सत्ता मिळवण्यासाठी घोषणांची गरज असते, बिहारमध्ये विश्वासाची! मतदार पोस्टर किंवा प्रचारावर नव्हे, तर स्वतःच्या अनुभवावर निर्णय घेतात. तेथील गावातील रस्त्यावर बसलेला एक वृद्ध शेतकरी, रिक्षा चालवणारा एक तरुण, चहाच्या टपरीवर वाद घालणारा एक शिक्षक, तेथील प्रत्येकाला राजकारण समजते. मतदार कदाचित सुशिक्षित नसेल; पण तो राजकीयदृष्ट्या साक्षर आहे. प्रत्येक रस्त्यावर एक विश्लेषक असतो, जो जातीय समीकरणे, आघाड्यांची ताकद आणि नेत्याच्या हेतूंवर त्यांचे मत मांडतो. ही बिहारच्या लोकशाहीची ताकद आहे. एनडीएमध्ये भाजप, जदयू आणि लोजपा यांचा समावेश आहे.

हिंदुत्ववादी विचारांसह उच्च जातींमधील मतदारांवर भाजपची मजबूत पकड आहे, तर जदयू मागास वर्गातील मतदारांवर आणि महिलांवर अवलंबून आहे. नितीशकुमार यांची सर्वात मोठी ताकद महिला मतदारांमध्ये आहे. महिलांनी त्यांना वारंवार सत्तेत परत आणले. आरक्षण आणि दारूबंदीवरील त्यांच्या निर्णयांमुळे महिला मतदारांमध्ये त्यांच्याशी भावनिक बांधिलकी निर्माण झाली. दुसरीकडे भाजप विकास आणि राष्ट्रीय नेतृत्वाच्या नावाखाली मते मागतो आहे. नितीश कुमार यांचे वय आणि थकवा लोकांना दिसत असला, तरीही भाजप आणि त्यांच्या पक्षाची आघाडी अजूनही एक मजबूत जोडी आहे. ‘लोजपा’चे चिराग पासवान त्यांच्या वडिलांच्या राजकीय छत्रछायेतून बाहेर पडण्यासाठी संघर्ष करत आहेत. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे त्यांचे मनोबल वाढले आहे; पण त्यांच्या स्वतःच्या गटात त्यांना धोका आहे.

त्यांचे काका पशुपती पारस, आता इंडिया आघाडीशी जवळीक साधत आहेत. दलित मतांमध्ये फूट पडणे एनडीएसाठी हानिकारक ठरेल. जीतन राम मांझी आणि उपेंद्र कुशवाहा यांसारख्या नेत्यांचा प्रभाव मर्यादित असू शकतो; पण बिहारच्या जातीय समीकरणांमध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. म्हणूनच एनडीएत अजूनही युती एकसंध असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय जनता दल हा इंडिया आघाडीचा प्राणवायू आहे. लालूप्रसाद यादव यांचे एमवाय समीकरण, त्यांची ही मुस्लीम आणि यादव मतपेटी अबाधित आहे. या दोन्ही समाजांतील एकत्रित मते बिहारमधील कोणत्याही निवडणुकीचा निकाल बदलू शकतात. तेजस्वी यादव यांनी बेरोजगारी, स्थलांतर आणि सामाजिक न्याय याबद्दल तरुणांच्या भाषेत बोलून तरुणांचे लक्ष वेधले आहे; पण राजदचे सर्वात मोठे आव्हान म्हणजे त्याची प्रतिमा. सत्तेत आल्यानंतर जंगलराज परत येते, असा या पक्षावर जुना आरोप. तेजस्वी ही प्रतिमा झटकून टाकण्याचा प्रयत्न करत आहेत;

त्यांचे स्वप्न ‘बिहारचे केजरीवाल’ बनण्याचे आहे; पण त्यांचा मार्ग कठीण आहे. ही अशी भूमी आहे, जी दिल्लीतील शक्तींना सातत्याने संकेत देत असते. येथेच खरी राजकारणाची नाडी धडधडते. म्हणूनच ही निवडणूक केवळ एका राज्याची नाही, तर संपूर्ण देशाची राजकीय दिशा ठरवेल. एनडीए पुन्हा सत्तेत आली, तर तो पंतप्रधान मोदी आणि भाजपसाठी राजकीय स्थिरतेचा संदेश असेल. तो देशाच्या विकासाला गती देणारा ठरेल. विरोधी पक्ष विशेषतः तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील ‘इंडिया’ आघाडी जिंकली, तर तो सत्ताधार्यांना इशारा असेल. हे केवळ एक राज्य नाही, तर राजकीय बॅरोमीटर असल्याने देशाची जनता कोणत्या दिशेने विचार करत आहे, याची ही चाचणी ठरेल.

# ‘माहिती अधिकार कायदा’ म्हणजे पारदर्शकतेकडे वाटचाल करणारी शक्ती -ॲड. राजेंद्र पांडे

## महाऊर्जा विभागीय कार्यालयात ‘माहिती अधिकार कार्यशाळा’ संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती,**

माहितीचा अधिकार अधिनियम हा केवळ कायद्यातील एक कलम नाही, तर लोकशाहीतील सामान्य नागरिकाला सशक्त करणारे शस्त्र आहे. योग्य माहितीच्या आधारे सामान्य माणूसही व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवू शकतो. ‘माहिती अधिकारी कायदा’ म्हणजे पारदर्शकतकडे वाटचाल करणारी शक्ती आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध विधिज्ञ ॲड. राजेंद्र पांडे यांनी आज येथे केले.

राष्ट्रीय माहिती अधिकार सप्ताहानिमित्त महाऊर्जा विभागीय कार्यालयाच्या वतीने सोमवारी (ता. ६ ऑक्टोबर) एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. यावेळी विभागीय महाव्यवस्थापक प्रफुल्ल तायडे, प्रकल्प अधिकारी हर्षल काकडे यांच्यासह महाऊर्जा विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विभागीय महाव्यवस्थापक श्री. तायडे यांनी माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व विशद करताना सांगितले की, हा कायदा सामान्य माणसाच्या हाती दिलेले लोकशाहीचे बलवान हत्यार आहे. माहिती ही पारदर्शक व जबाबदार प्रशासनाची पूर्वअट आहे. त्यामुळे हा कायदा केवळ माहिती मिळवण्यासाठी नव्हे, तर जबाबदारी निश्चित करण्यासाठी देखील अत्यंत उपयुक्त आहे.ॲड. पांडे यांनी आपल्या सखोल मार्गदर्शनात माहिती अधिकार कायद्यातील प्रमुख कलमांची सुलभ व्याख्या सांगितली. ते म्हणाले की, माहिती संदर्भात मागण्या, उत्तर देण्याची कालमर्यादा, माहिती न दिल्यास कायदेशीर पर्याय, अपिलीय यंत्रणा आणि न्यायप्रविष्ट प्रक्रियांचे मार्ग याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

प्रत्यक्षात घडलेल्या प्रेरणादायी घटनांचा उल्लेख करत ड. पांडे यांनी स्पष्ट केले की, कधी कधी एक छोटासा माहितीचा अर्ज एखाद्या मोठ्या भ्रष्टाचारावर प्रकाश टाकू शकतो. त्यामुळे नागरिकांनी निडरपणे माहिती मागावी आणि प्रशासनाने पारदर्शकतेने ती पुरवावी, हाच या कायद्याचा मूळ गाभा आहे.कार्यशाळेच्या शंका-समाधान सत्रात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या अनुभवांचे कथन करुन विविध शंकाचे निराकरण करुन घेतले. प्रत्यक्ष अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी, माहिती देताना घ्यावयाची दक्षता, तसेच अर्जदारांच्या मनोभूमिकेचा विचार कसा करावा याबाबतही यावेळी सखोल चर्चा झाली. उपस्थितांनी कार्यशाळेतील संवाद मुलकता आणि ज्ञानपर मांडणीचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी महाऊर्जा विभागाच्यावतीने प्रकल्प अधिकारी श्री. काकडे यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, ही कार्यशाळा म्हणजे केवळ एक दिवसाचा उपक्रम नसून, माहिती अधिकाराच्या चळवळीला अधिक व्यापक आणि प्रभावी दिशा देण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. विभाग म्हणून आम्ही माहितीच्या अधिकाराचे संपूर्ण पालन करत राहू. महाऊर्जा विभागाची ही कार्यशाळा म्हणजे माहिती अधिकार कायद्याबाबत केवळ प्रशिक्षण नव्हे, तर एक वैचारिक चळवळ उभी करण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरली आहे. लोकशाहीतील पारदर्शकतेचा मूलभूत विचार या कार्यशाळेच्या केंद्रस्थानी होता, आणि त्या विचारांची रुजवणूक अधिक व्यापक प्रमाणावर करण्याचा निर्धार यामधून प्रकर्षाने जाणवला. ही कार्यशाळा म्हणजे माहिती अधिकाराच्या सशक्त अंमलबजावणीची नवी पायरीच ठरली, असा मनोदय यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.




## कान साफ करण्याची ’ही’ सवय आजच थांबवा! कारण जबड्याच्या हालचालीमुळे नैसर्गिक कानाची होते स्वच्छता!

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक**

कान हा आपल्या शरीराचा किती महत्त्वाचा भाग आहे, हे वेगळं सांगायला नको. पण या कानाला सुरक्षित ठेवण्याऐवजी आपण अनेकदा मोठी चूक करतो. ती म्हणजे इअरबड्स किंवा कॉटन स्वॅब वापरून कान साफ करण्याचा प्रयत्न करणे! जर तुम्हीही हे करत असाल, तर आता थांबण्याची वेळ आली आहे, कारण तज्ज्ञांनी या सवयीबद्दल गंभीर इशारा दिला आहे. तज्ज्ञांच्या मते, कान हा एक स्वयंचलित साफसफाई करणारा अवयव आहे. त्याला बाहेरून कोणत्याही ’हाय-टेक’ वस्तूंची किंवा चमच्यांची गरज नसते.



**कान स्वतःची स्वच्छता कशी करतो?** - हे समजून घेणे खूप सोपे आहे. आपल्या कानात जो ’मळ’ (एरीुर) तयार होतो, तो खरंतर सुरक्षेसाठी असतो. तो धूळ आणि जंतूंना आत जाण्यापासून थांबवतो.

**जबड्याची जादू:** जेव्हा आपण चघळतो, बोलतो किंवा जांभई देतो, तेव्हा आपल्या जबड्याची हालचाल होते.

या हालचालीमुळे हा मळ आपोआप बाहेरच्या बाजूला (एरी उरपरश्र जशिप-ळपस) ढकलला जातो.

म्हणजेच, तुम्हाला कोणतीही वस्तू कानात टाकण्याची गरजच नाही! मळ आपोआप बाहेर येतो किंवा वाळून पडतो.

कॉटन स्वॅब धोकादायक का आहेत?

कॉटन स्वॅब वापरणे म्हणजे तुम्ही कानाच्या या नैसर्गिक प्रक्रियेत थेट अडथळा आणत आहात. वॉशिंग्टन पोस्टच्या एका रिपोर्टनुसार, न्यूरोटोलॉजिस्ट आणि प्राध्यापिका अना एच. किम यांनी याबद्दल गंभीर धोके सांगितले आहेत:

मळ जातो आत! तुम्ही जेव्हा इअरबड कानात घालता, तेव्हा त्यावर थोडा मळ लागलेला दिसतो, पण त्यातील जास्त भाग हा उलट्या दिशेने, म्हणजे कानात खोलवर ढकलला जातो. पेनसिल्व्हेनिया युनिव्हर्सिटीच्या सहाय्यक प्राध्यापिका टिफनी चाओ या म्हणतात की, अर्धे मेण बाहेर येते आणि उर्वरित अर्धे अधिक खोलवर ढकलले जाते.

ऐकू कमी येणे: हा ढकललेला मळ आत जाऊन जाड थर तयार करतो. यामुळे तुम्हाला ऐकू कमी येणे किंवा कान भरल्यासारखे वाटणे अशा समस्या येतात.

दुखापत आणि अपघात: कॉटन स्वॅबमुळे कानाच्या नाजूक पडद्याला किंवा कान नलिकेला गंभीर इजा होऊ शकते. डॉक्टर किम यांनी स्वतः काही रुग्णांच्या कानात कॉटन स्वॅबचे छोटेसे डोके अडकलेले पाहिले आहे.

एका अभ्यासात हे सिद्ध झाले आहे की, प्रौढांच्या कानात अडकलेल्या परदेशी वस्तूंमध्ये इअरबड्स हे सर्वात सामान्य होते.

# पिकांवर फवारणी करताना अंगाला खोबरेल तेल का लावावे, वाचा सविस्तर

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक**

किटकनाशके, बुरशीनाशकांची फवारणी करतांना निष्काळजीपणामुळे, अनावधानाने अथवा नजर चुकीने विषबाधा होऊ शकते ते टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी. फवारणी करताना नेमके काय करावे वाचा सविस्तर




**शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी**- वारा शांत असताना म्हणजे सकाळी लवकर अथवा सायंकाळी उशिरा फवारणी करावी. फवारणी वाऱ्याच्या प्रवाहाच्या दिशेने करावी.

किटकनाशके, बुरशीनाशकांची फवारणी करण्यापूर्वी शरीराच्या उघड्या भागावर खोबरेल तेलाचे लेपण करुन फवारणी करावी. त्यामुळे त्वचेला बाधा होणार नाही. फवारणी करताना किटकनाशकाचा त्वचेशी व डोळ्याशी संपर्क होणार नाही याची दक्षता घ्यावी.

फवारणी करतांना किटकनाशकाचे अंश नाकाव्दारे श्वसन मार्गात व तोंडाद्वारे पोटात प्रवेश करणार नाहीत, यासाठी नाकाला व तोंडाला मास्क, रुमाल बांधावा. तसेच डोळ्यावर चश्मा घालावा, केस झाकावेत. फवारणी करताना अंगभर कपडे घालावेत.

शक्यतो वॉटर प्रूफ सुरक्षा कीटचा वापर करावा.

पिकाची उंची एक फूट वा त्यापेक्षा जास्त असल्यास फवारणी करताना गम बुटचा वापर करावा.

फवारणीचा व्यवसाय करणारे शेतकरी, शेतमजूर यांनी तालुक्याच्या आरोग्य केंद्रामध्ये नियमित आरोग्य तपासणी करुन घ्यावी.

किटकनाशके, बुरशीनाशके पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून व खाद्यपदार्थापासून दूर ठेवावेत.

तसेच फवारणी नंतर फवारा व किटकनाशकाचे रिकामे डबे वाहत्या पाण्यात धुऊ नये.

किटकनाशकाचे रिकामे डबे इतर उपयोगासाठी न वापरता ते खोलवर जमिनीत पुरुन टाकावेत. किटकनाशके, बुरशीनाशके फवारणी करतांना ते वा त्यांचे अंश जनावरांच्या चाऱ्याच्या, खाद्यपदार्थांच्या संपकांत येणार नाहीत वा त्यावर उडून जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

विहीर, नदी, नाले, ओढे अथवा पानवठे यांच्या संपर्कात किटकनाशके, बुरशीनाशके येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.




फवारणी करताना वा फवारणी झाल्यानंतर शेतकरी, शेतमजुरास अस्वस्थ वाटत असल्यास घरगुती उपचार न करता त्वरित नजीकच्या आरोग्य केंद्रात पुढील उपचारासाठी दाखल करावे.

तसेच प्रसार मध्यमांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी वर्तमानपत्रातून याची मोफत व व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी व कृषि विभागाने केले आहे. ढगाळ वातावरणात ईसी फॉर्मुलेशनऐवजी एससी फार्मूलेशनच्या किटकनाशके, बुरशीनाशकांची फवारणी करावी,

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# कारागृहातील कैद्यांकडे सापडलेले मोबाइल पोलिसांनी घेतले ताब्यात

## मोबाइल करागृहात आले कसे, कोडे मात्र कायमच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**अमरावती मध्यवर्ती कारागृहातील अंडा सेलमधील दोन कैद्यांकडे तीन मोबाइल व दोन बॅटरी आढळल्यामुळे कारागृह प्रशासनाने जप्त केले होते. या प्रकरणात दोन कैद्यांविरुद्ध फ्रेजरपुरा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान फ्रेजरपुरा पोलिसांनी कारागृहात जावून मंगळवारी ७ ऑक्टोबरला ते तिन्ही मोबाइल जप्त केले असून, सखोल तपासासाठी फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठवणार आहेत. अमरावती मध्यवर्ती कारागृहातील अंडा सेलमधील खोली क्रमांक २ व ३ मध्ये असलेल्या दोन जन्मठेपेच्या कैद्यांजवळ ॲपल कंपनीच्या महागड्या मोबाइलसह तीन मोबाइल ५ ऑक्टोबरला सापडले होते. मोबाइल ताब्यात घेण्यासाठी पोलिसांनी कारागृह प्रशासनाला पत्र दिले होते. त्या दोन कैद्यांकडे हे मोबाइल मागील किती दिवसांपासून आहेत, त्या मोबाइलच्या माध्यमातून त्यांनी आजवर कोणाकोणाशी संवाद साधला, कोणाचे फोटो, व्हिडिओ काढलेत, मोबाइल त्यांनी आतमध्ये नेले कसे, कारागृहात कैदी बाहेरुन आत जातात त्यावेळी अतिसुक्ष्म तपासणी केली जाते, अनेकदा आकस्मिक झाडाझडती घेतली जाते, असे सर्व नियम लागू असतानाही कैद्यांकडे थेट अंडसेलमध्ये मोबाइल गेले कसे, अशा अनेक प्रश्नांची उकल फ्रेजरपुरा पोलिसांना तपासादरम्यान करायची आहे.

**मोबाईल फॉरेन्सिककडे पाठवणार–** कारागृहात कारागृहात दोन कैद्यांकडे सापडलेले तीन मोबाइल आम्ही कारागृहातून ताब्यात घेतलेले आहेत. आता तिन्ही मोबाइल तपासणीसाठी फॉरेन्सिक लॅबकडे पाठवणार आहोत. फॉरेन्सिक लॅबचा अहवाल आल्यानंतर पुढील तपासाची दिशा निश्चित होणार आहे. आकाश वाठोरे, तपास अधिकारी पीएसआय.-

# आता निकषात न बसणाऱ्या शेतकऱ्यांनाही मिळणार मदत, दुष्काळी सवलतीही लागू; वाचा सविस्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ अमरावती**

अस्मानी संकटामुळे खचलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. पूरग्रस्त भागात नुकसानीसाठी तातडीची १० हजाराची मदत देण्यात आली आहे. अशा संकट काळात अन्नदाता बळीराजाच्या मदतीसाठी शासन धावून आले आहे.

खरडून गेलेल्या जमिनींना प्रति हेक्टरी ४७ हजार रूपये मदत देण्यात येणार आहे. तसेच मनरेगा (महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना) मधून तीन लाख रूपये प्रति हेक्टरी देण्यात येतील.

**निकषात न बसणाऱ्या शेतकऱ्यांनाही मदत**

शेतकऱ्यांना मदत देताना ॲग्रीस्टॅकमधील माहिती ग्राहा थरली जाणार आहे. मदतीसाठी शेतकऱ्यांना कुठलीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. जे शेतकरी मदतीच्या निकषात बसणार नाहीत, त्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मदत दिली जाणार आहे.

साखर कारखान्यांच्या नफ्यातून प्रति टन ५ रुपये कापण्याच्या निर्णयावर टीका होत असून, त्याबाबत मुख्यमंत्री म्हणाले की, या पाच रुपयांचा विचार केला तर फक्त ५० कोटी रुपये मिळतात. कारखान्यांकडून हे पैसे घेतले जाणार आहेत, शेतकऱ्यांच्या एफआरपीमधून पैसे कापले जाणार नाहीत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

पूरग्रस्तांसाठी अचानक तरतूद करावी लागल्यामुळे विकासकामांवर ताण येईल. काही ठिकाणी काही बाबींवर खर्च कमी करावा लागेल, असेही ते म्हणाले.



**दुधाळ जनावरांच्या मर्यादाची अट काढली**

दुधाळ जनावरे दगावली असल्यास तीन जनावरांपर्यंतच मदत मिळत होती, आता ही मर्यादेची अट काढून टाकली आहे.

रब्बी पिकांच्या नुकसानीसाठी प्रति हेक्टर १० हजार रुपये दिले जाणार आहेत.

विहिरींच्या नुकसानीसाठी आतापर्यंत मदत मिळत नव्हती, यावेळी ती प्रति विहीर ३० हजार रुपये दिली जाणार आहे.

तातडीच्या मदतीसाठी १५०० कोटी रुपये जिल्हा नियोजन निधीत राखीव ठेवण्यात आले आहेत.

**तीन हेक्टरपर्यंत मदत**

एनडीआरएफच्या निकषानुसार कोरडवाहू जमिनीसाठी पूर्वी ८,५०० रुपये मदत मिळत होती, ती आता १८ हजार ५०० करण्यात आली आहे. हंगामी बागायतीसाठी १७ हजार ऐवजी २७ हजार, तर बागायतीसाठी २२ हजार ५०० ऐवजी ३२ हजार ५०० रुपये मदत दोनऐवजी तीन हेक्टरच्या मर्यादेपर्यंत केली जाणार आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ८ ऑक्टोंबर २०२५ शहर/ग्रामिण

## धामणगाव रेल्वे नगरपरिषद निवडणूक

# प्रभागनिहाय आरक्षण जाहीर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८धामणगाव रेल्वे**

नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रभागनिहाय आरक्षण जाहीर करण्यात आले. नगर परिषद सभागृहात पार पडलेल्या सोडतीद्वारे आरक्षण निश्चित करण्यात आले असून, विविध प्रवर्गासाठी जागांचे वाटप करण्यात आले आहे. प्रभाग १ अ ओबीसी, ब महिला ओपन, २ अ अनुसूचित जाती महिला, ब सर्वसाधारण, ३ अ ओबीसी महिला, ब सर्वसाधारण, ४ अ ओबीसी महिला, ब सर्वसाधारण, ५ अ ओबीसी महिला, ब सर्वसाधारण, ६ अनुसूचित जाती, ब सर्वसाधारण महिला, ७अ सर्वसाधारण महिला, ब सर्व साधारण महिला, ८ अ ओबीसी, ब सर्व साधारण महिला, ९ अ एसटी महिला, ब सर्वसाधारण, १० अएससी महिला, ब सर्वसाधारण महिला असे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

आता निवडणुकीकडे नागरिकांचे लक्ष लागले असून, विविध राजकीय पक्ष, उमेदवार प्रचाराची तयारीला लागणार आहे. ही सोडत उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे, न. प. मुख्याधिकारी पूनम कळंबे, विविध पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार, पोलीस प्रशासन यांच्या उपस्थितीत काढण्यात आली.

# अमरावती रेल्वे ओव्हरब्रिजचे होणार भव्य निर्माण

## रेल्वे ओव्हरब्रिज निर्माण कार्याला रेल्वेमंत्र्यांची हिरवी झेंडी

### खा.डॉ.अनिल बोंडे यांच्या प्रयत्नांना यश





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

अमरावती मॉडेल रेल्वेस्थानक ते राजकमल चौक मार्गावरील रेल्वे ओव्हरब्रिजचे पुनर्निर्माण करण्याची मागणी खा. डॉ. अनिल बोंडे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली. त्याची दखल घेत, रेल्वे ओव्हरब्रिज निर्माणकार्यालारेल्वेमंत्र्यांनी हिरवी झेंडी दाखविली आहे. लवकरच या पूलाच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात होणार आहे.

अमरावती शहराच्या विविध भागांना जोडणारा रेल्वे ओव्हरब्रिज १९६३ मध्ये उभारण्यात आला होता. त्याचे आयुर्मान संपल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पुल वाहतूकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे शहरवासियांना असुविधेला समोर जावे लागत आहे. ही बाब लक्षात घेता राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी याठिकाणी उड्डाणपूल निर्माण करण्याची मागणी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. त्यासाठी त्यांनी २५० कोटी रुपयाच्या निधीची आवश्यकता असल्याचेही रेल्वेमंत्र्यांना लक्षात आणून दिले होते. खा. डॉ. बोंडे यांच्या या मागणीची मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दखल घेत रेल्वे मंत्रालयाद्वारे वा ठिकाणी उड्डाणपूल निर्माणाची प्रक्रिया अंतिम टप्यात आली असल्याचे कळविले आहे. शिवाय, सार्वजनिक बांधकाम विभागाला आवश्यकती प्रशासकीय प्रक्रिया पुर्ण करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे ना. वैष्णव यांनी म्हटले आहे. येत्या काही दिवसांतच या ठिकाणी रेल्वे उड्डाणपुलाचे काम प्रत्यक्षात सुरू होण्याची चिन्हे आहेत.

# संत बाबा हरदासराम सेवामंडळ येथील प्रदर्शनीमध्ये भीषण आग

## शेकडो महिलांची होती उपस्थिती, दस्तुरनगर येथील घटना

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.८अमरावती**–दस्तुर नगर येथील संतबाबा हरदासराम सेवा मंडळ कार्यालयात सुरू असलेल्या कपडयाच्या प्रदर्शनीमध्ये सोमवारी (ता. सहा) रात्री ८ वाजताच्या सुमारास भीषण आग लागल्याने चांगलाच गोंधळ उडाला. यावेळी २०० ते ३०० महिला प्रदर्शनीमध्ये होत्या, परंतु वेळीच अग्निशमन विभाग पोहचल्याने मोठी घटना टळली. दस्तुरनगर परिसरात संतबाबा हरदासराम सेवा मंडळ आहे. खाली संतबाबा हरदाराम यांचे छोटे मंदिर आहे आणि वर हॉल आहे. या हॉलमध्ये संधी समाज बांधवाचे छेटे-मोठे कार्यक्रम होत असतात.दिवळीनिमीत्त सोमवारपासून समाजातील काही व्यापाऱ्यांनी दिवाळी प्रदर्शनी लावली होती. यामध्ये कपडे, ज्वेलरी, खाद्यपदार्थाचे स्टॉलसह अन्य ४० ते ४५ दुकाने थाटली होती आणि सोमवारी सकाळी प्रदर्शनीचे उद्धाटन झाले होते. सायंकाळपासून परिसरातील महिलांची प्रदर्शनी पाहण्याकरिता मोठ्या प्रमाणात गर्दी होती. रात्री ८ वाजताच्या सुमारास प्रदर्शनीमध्येमहिला कपडे व ज्वेलरी पाहत असताना विद्युत मिटरमध्ये अचानक शॉट सर्कीट झाल्यामुळे आग लागली. काही वेळातच आग प्रदर्शनीमध्ये पोहचली. त्यामुळे महिला व दुकानदार घाबरले आणि सर्व हॉलमधून बाहेर निघण्याचा प्रयत्न करीत होते. त्यामुळे एकच गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरी झाली. स्थानिकांनी अग्निशन विभागाला माहिती दिली. माहिती मिळताच दोन बंब घटनास्थळी पोहचले. परंतु प्रदर्शनीमध्ये मोठ्या संख्याने महिला व पुरुष असल्याने त्यांनी रेस्क्यू पथकाला पाचारण करण्यातआले.

तत्काळ रेस्क्यू पथकाने सर्व महिलांसह पुरुषांना बाहेर काढून आगिवर नियंत्रण मिळविले. त्यानंतर त्यांनी पाहणी केली असता ज्या हॉलमध्ये प्रदर्शनी होती. तेथील दुकानदारांन हॉलच्या खाली एकाच मिटरमधून अवैध विद्युत पुरवठा घेतल होता. त्यामुळे शॉट सर्कीट झाले आणि आग लागली. प्रशासनान या घटनेची गंभीर दखल घेऊन आयोजकांवर कायदेशीर कारवा करण्याची मागणी सर्व सामान्य नागरिक करीत आहे.

# कडवी बाजारातून पाच ट्रक प्लास्टिक जप्त

## महापालिकेची धडाकेबाज कारवाई





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

अमरावती महानगर पालिकेतर्फे प्लॅस्टिकमुक्ती अभियानाअंतर्गत स्थानिक कडवी बाजार परिसरात मोठ्या प्रमाणावर घडक तपासणी मोहीम राबवण्यात आली. या कारवाईत मनपाच्या पथकाने बंदी असलेल्या प्लॅस्टिक साहित्याचा पाच ट्रक मोठा साठा जप्त केला.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या आदेशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक व सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभाग व स्वच्छता विभागाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. मनपाचे पथक कडवी बाजार परिसरात दाखल झाले. तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणात बंदी घातलेल्या प्लॅस्टिक पिशव्या, एकदाच वापरायचे कप, प्लेट्स, ग्लासेस आणि अन्य प्लॅस्टिक साहित्य विक्रीसाठी ठेवलेले आढळले. मनपाच्या अधिकाऱ्यांनी त्वरित ती सर्व सामग्री ताब्यात घेऊन पाच ट्रक प्लॅस्टिक साठा जप्त केला व पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली.पूर्वसूचना देऊनही अनेक व्यापारी बंदी घातलेल्या प्लॅस्टिकचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आल्याने मनपाने ही कठोर कारवाई केली. या मोहिमेत अतिक्रमण निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक आणि कर्मचारी सहभागी झाले होते.

राज्य शासनाने घालून दिलेल्या नियमांनुसार बंदी घातलेले प्लॅस्टिक वापरू नये. प्लॅस्टिकमुक्त अमरावती हे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांनी स्वयंस्फूर्त सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.

# झोननिहाय पाचही साफसफाई कंत्राट रद्द

## २१ दिवसात नवीन निविदा प्रक्रिया करावी उच्च न्यायालयाचे आदेश





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती** – मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मंगळवारी अमरावती महापालिका क्षेत्रातील साफसफाईचे पाचही कंत्राट सदोष ठरवून रद्द करण्याचे आणि २०२२ मध्ये विभाग–आधारित स्वच्छता करार रद्द करण्याचे आदेश दिले. शिवाय, उच्च न्यायालयाने महानगर पालिका प्रशासनाला २१ दिवसांच्या आत नवीन स्वच्छता करारासाठी नवीन निविदा प्रक्रिया सुरू करण्याचे आणि २१ दिवसांच्या आत न्यायालयात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.झोननिहाय कंत्राट देताना सफाई कर्मचाऱ्यांची संख्या निर्दिष्ट करण्यात आली नसल्याचा आरोप आहे. यामुळे कंत्राटदारांना कर्मचारी नियुक्त करण्यात बराच विवेक वापरता आला. गेल्याकाही काळापासून, शहरातील बिघडलेल्या स्वच्छता व्यवस्थेबद्दल व्यापक असंतोष पसरला आहे, असे सांगत माजी नगरसेवक बाळासाहेब भुयार, धीरज हिवसे आणि माजी महापौर संजय नरवणे यांनी या झोननिहाय कंत्राटाला आव्हान देणारी याचिका न्यायालयात दाखल केली. त्यावर न्यायालयाने उपरोक्त आदेश दिले आहेत.

तत्कालीन महापालिका आयुक्त प्रवीण आष्टीकर यांच्या कार्यकाळात २०२२ मध्ये काही विशिष्ट कंत्राटदारांना लक्षात घेऊन झोननिहाय कंत्राट प्रक्रिया राबविण्यात आली. त्याविरोधात न्यायालयात धाव घेण्यात आलेली होती. उच्च न्यायालयाने निकाल देत तत्कालीन प्रशासकीय कारवाई चुकीची असल्याचे घोषित केले.

कोणत्याही कंत्राट प्रक्रियेत घेतलेली सुरक्षाठेव करार पूर्ण झाल्यानंतर परत केली जाते. तथापि, या झोननिहाय कंत्राट प्रक्रियेत, महानगरपालिकेने असामान्य पद्धतीनुसार, कंत्राटदारांना कंत्राटदिल्यानंतर काही महिन्यांनीच हे पैसे परत केले. तत्कालीन आयुक्तांनी नियमांचेउल्लंघन करून अनेक स्पष्टीकरणे दिली. त्यानंतर, पाच झोनपैकी दोन झोन क्षेत्राच्या साफसफाईचे कंत्राट गोविंदा नावाच्या संस्थेला देण्यात आले, तर दोन झोनचे साफसफाईचे कंत्राट श्री इष्टाला देण्यात आले आणि एका झोनचे कंत्राट क्षितिज संस्थेला देण्यात आले होते.हायकोर्टाचा हा निकाल अमरावतीकरांसाठी मोठा दिलासा ठरला असून, शहर स्वच्छ आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी प्रशासन किती तत्परतेने काम करते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आठ दिवसात स्वच्छतेसाठी टेंडर लावण्याचे आदेश !

अमरावती शहरातील स्वच्छतेच्या कामात चाललेल्या अनियमिततेविरोधात नागरिकांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर अखेर हायकोर्टाने हा महत्वाचा निकाल दिला आहे. हायकोटनि अमरावती महानगरपालिकेला स्पष्ट निर्देश दिले आहेत की, आठ दिवसांच्या आत नवीन स्वच्छता टेंडर प्रक्रिया सुरू करा. तसेच, सध्या स्वच्छतेच्या कामात गुंतलेल्या ठेकेदारांविरुद्ध डिसिप्लिनरी (दंडात्मक) कारवाई करण्याचे किंवा त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश देखील न्यायालयाने दिले आहेत. नागरिकांनी अनेकदा तक्रारी करूनही शहरातील कचरा व्यवस्थापनात सुधारणा झालेली नसल्याने ही याचिका दाखल करण्यात आली होती. हायकोटनि महानगरपालिकेला फटकारत म्हटले की, शहरातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणे अमान्य आहे. स्वच्छतेची जबाबदारी प्रशासनाची आहे आणि त्यात कोणतीही ढिलाई चालणार नाही.

# नागपूरहून उड्डाण अध्यर्या तासात विमान परत फिरले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८नागपूर :** नागपूरहून अहमदाबादकडे जाणाऱ्या इंडिगोच्या विमानाला उड्डाणानंतर अवघ्या ४० मिनिटांत तांत्रिक बिघाडामुळे नागपूर विमानतळावर परत उतरावे लागले. ही आपत्कालीन लँडिंगची घटना प्रवाशांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण करणारी ठरली.इंडिगो एअरलाइन्सचे विमान क्रमांक ६ई७२४६ ने मंगळवारी सकाळी ८.१० वाजता नागपूरहून अहमदाबादकडे उड्डाण केले. मात्र काही वेळातच कॉकपीटमध्ये तांत्रिक समस्या जाणवू लागल्याने वैमानिकाने तात्काळ निर्णय घेऊन विमान परत नागपूरकडे वळवले. विमानाने सकाळी ८.५० वाजता सुरक्षितपणे नागपूर विमानतळावर लँडिंग केले.विमानात ७८ प्रवासी आणि चार कर्मचारी होते. विमानतळ प्रशासनाने तातडीने आपत्कालीन उपाययोजना राबवून सर्व प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित केली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.कॉकपीटमध्ये तांत्रिक समस्या आढळून आल्याने वैमानिकाने खबरदारीचा उपाय म्हणून विमान माघारी आणण्यात आले. याप्रकरणी सर्व आवश्यक तपासणी सुरू आहे, असल्याची माहिती आहे. या घटनेनंतर प्रवाशांना पुढील उड्डाणासाठी दुसऱ्या विमानाची व्यवस्था करून दिल्याचेही सूत्रांनी सांगितले.

# मोठा निर्णय ! 'टीईटी' शिवाय शिक्षकांना पदोन्नतीवर बंदी

## सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर या बढत्या स्थगित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती–** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार इयत्ता १ ते ८ पर्यंतच्या वर्गामध्ये अध्यापन करणाऱ्या जिल्हा परिषद, खासगी प्राथमिक तसेच अध्यापन करणाऱ्या जिल्हा परिषद,खाजगी प्राथमिक तसेच अनुदानित माध्यमिक शाळांतील शिक्षकांसाठी 'ढएढ' परीक्षा अनिवार्य ठरविण्यात आली आहे.न्यायालयाच्या आदेशानुसार आता फक्त 'ढएढ' पात्र शिक्षकांनाच मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकारी या पदांवर पदोन्नती मिळू शकणार आहे. ज्या शिक्षकांकडे पदोन्नतीसाठी आवश्यक सेवा ज्येष्ठता आहे पण 'ढएढ' पात्रता नाही, त्यांना पदोन्नती मिळणार नाही.

केंद्रप्रमुखांच्या ५०% पदांची भरती सरळसेवा आणि उर्वरित ५०% पदे पदोन्नतीच्या माध्यमातून केली जातात. विस्ताराधिकाऱ्यांच्या नियुक्तीसाठीही हाच नियम लागू आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या १ सप्टेंबरच्या आदेशानंतर सध्या मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्ताराधिकाऱ्यांच्य पदोन्नतीची प्रक्रिया थांबविण्यात आली आहे.अनेक शिक्षणाधिकाऱ्यांनी शासनाकडे याबाबत मार्गदर्शन मागितले असून, लवकरच शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालकांकडून मार्गदर्शक सूचना जारी केल्या जाणार आहेत. त्यानंतरच पदोन्नतीची कार्यवाही सुरू होईल. तत्पूर्वी ही प्रक्रिया स्थगित राहणार आहे. 'ढएढ' पात्र असलेल्या शिक्षकांनाच सध्या पदोन्नतीचा लाभ मिळणार असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

मार्गदर्शक सूचनांनुसार होणार पुढील कार्यवाही

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकारी पदांसाठी 'ढएढ' पात्रता बंधनकारक असेल. शासनाकडून लवकरच संबंधित मार्गदर्शक सूचना जारी होणार असून, त्यानुसार पुढील प्रक्रिया पार पाडली जाईल असे शिक्षण विभागाचे अधिकारी,कर्मचारी सांगतात.

### शिक्षकांसाठी 'TET' बंधनकारक, ३१ ऑक्टोबर पर्यंत करा अर्ज

१सप्टेंबर रोजी दिलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार इयत्ता १ ते ८ वर्गात अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांना 'ढएढ' परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य आहे. यासाठी शिक्षकांना २ वर्षांची मुदत देण्यात आली असून, त्या कालावधीत परीक्षा देणारे किंवा अपयशी ठरलेले शिक्षक यांच्यावर सक्तीची निवृत्ती लागू होईल.

राज्य सरकारकडून अद्याप या निर्णयावर अधिकृत भूमिका जाहीर झालेली नसली तरी 'ढएढ' उत्तीर्ण करणे शिक्षकांसाठी बंधनकारक राहील. दरम्यान, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने 'ढएढ' परीक्षेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ९ ऑक्टोबर पर्यंत वाढवली आहे.शिक्षक संघटना शासनाच्या निर्णयाकडे लक्ष ठेवुन आहे.

शिक्षण राज्यमंत्री ना.पंकज भोयर यांनी शिक्षक संघटनेला दिलेले आश्वसनामुळे ४ऑक्टोंबरचे आंदोलन तातपुरते स्थगित केले आहे.शासनाने योग्य भूमिका घेतली नाही तर राज्यातील सर्व शिक्षक संघटना,शिक्षक आमदार आंदोलन करणार आहे.डीसेंबर-जानेवारी मध्ये शिक्षक मतदार संघाच्या निवडणूका आहे.या निवडणूकीवर या आंदोलनाचा परीणाम होणार आहे.

# अमरावती विद्यापीठात युवा महोत्सवाला सुरुवात












**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने व श्रीमती केसरबाई लाहोटी महाविद्यालयाच्या यजमानपदाखाली आयोजित युवा महोत्सव २०२५ युवा स्पंदनमध्ये पाचही जिल्ह्यातील नर्तकांनी पारंपरिक लोकनृत्यासह शास्त्रीय नृत्याविष्कार सादर केला. महाराष्ट्रासह राजस्थानी, गुजराती, आदिवासी संस्कृतिचा नृत्यांमध्ये विशेष पगडा दिसून आला. यापैकी एका महाविद्यालयाने श्री विठ्ठल-रुक्मिणी यांची वारकरी संप्रदायाद्वारे केली जाणारी पूजा या विषयावर मराठमोळ्या पोशाखात नृत्य सादर केले, तसेच एका महाविद्यालयाने श्रीकृष्ण लिलेकर आधारीत

दिवशी स्पर्धक विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह दिसून आला.

# जीव धोक्यात घालून शेतीची वाटचाल

## तळेगावला पूल मंजुरीची मागणी जोरात



## तळेगाव ठाकूर ग्रामस्थांची काँग्रेस कमिटीमार्फत मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८तिवसा-** तिवसा तालुक्यातील प्रगत गाव असलेल्या तळेगाव ठाकूर येथे पिंगळाई नदीवर पूल नसल्यामुळे शेतकरी, मजूर व ग्रामस्थांना दररोज जीव धोक्यात घालून नदी ओलांडावी लागत आहे. नदीतून जाणाऱ्या या धोकादायक मार्गावर अनेक अपघातही झाले असून, गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेतीमाल वाहतूक, दैनंदिन जीवनातील अडथळे, आणि विशेषतः पावसाळ्यात वाहतूक विस्कळीत होणे ही समस्या गंभीर बनली आहे. यावर त्वरित उपाययोजना होण्यासाठी अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी अलीकडेच तळेगाव ठाकूर येथे भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांना या संदर्भात आवश्यक सूचना दिल्या आहेत.

यानंतर तिवसा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष वैभव वानखडे यांनी शेतकरी व पदाधिकाऱ्यांसमवेत मुख्यमंत्री ग्रामसडक योजना कार्यकारी अभियंता, वनविभाग आणि जिल्हाधिकारी यांना निवेदन देत या कामाला तातडीने गती देण्याची मागणी केली आहे.

तसेच ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी माजी मंत्री ड. यशोमती ठाकूर यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली. शेतकऱ्यांच्या या समस्यांची गंभीर दखल घेत त्यांनी प्रशासनाकडे तातडीने कार्यवाहीचे आश्वासन दिले.

शेतकऱ्यांनी यावेळी असेही सांगितले की, विधानसभा निवडणुकांनंतर जवळपास ११ महिने उलटले असून, निवडणूक आचारसंहितेमुळे या कामाची वारंवार दिरंगाई होत आहे, ही बाब अत्यंत दुःखदायक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या निवेदनप्रसंगी तालुका काँग्रेस अध्यक्ष वैभव वानखडे, माजी सरपंच किशोर गेडाम, जितेंद्र ठाकूर, अमोल पन्नासे, विश्वजीत बाखडे, मंगेश राऊत यांच्यासह तळेगाव व तालुक्यातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# दिव्यांग शिक्षक, कर्मचाऱ्यांची पडताळणी सुरू

## एकाच दिवशी साडेचारशे कागदपत्रांची तपासणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**,राज्यात विविध शासकीय विभागांमध्ये अनेक बनावट दिव्यांग कर्मचारी कार्यरत असल्याचा आरोप होत आहे. त्या अनुषंगाने दिव्यांग कल्याण विभागाकडून देण्यात आलल्या आदेशानुसाार जिल्हापरिषदेंतर्गत सर्वच विभागांतील कार्यरत दिव्यांग कर्मचारी तसेच शिक्षकांच्या दिव्यांगत्व प्रमाणपत्र (युडीआयडी कार्ड)ची तपासणी सुरू झाली आहे.सोमवार पासून प्राथमिक व माध्यमिक असे मिळून जवळपास साडेचारशे दिव्यांग शिक्षकांच्या प्रमाण पत्रांची तपासणी करण्यात आली. तीन आक्टोबरला सामान्य प्रशासन विभाग, पशुसंवर्धन, ग्रामीण पाणी पुरवठा, बांधकाम, कृषी, वित्त, महिला व बालकल्याण तसेच सिंचन अशा आठ विभागांतील कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची आनलाई पडताळणी करण्यात आली. सोमवारी प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या कागदपत्रांची तपासणी झाली. त्यामुळे जिल्हापरिषदेचा परिसर शिक्षकांच्या गदीने फुलून गेला होता. मंगळवारी आरोग्य तर बुधवारी पंचायत विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आली आहे. राज्यात अनेक विभागांमध्ये बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे अनेक जण दिव्यांग प्रमाणपत्राचा लाभ घेवून काम करित असल्याचा आरोप होत आहे. त्या अनुषंगाने दिव्यांग कल्याण विभागाचे आयुक्तांनी सर्व जिलहापरिषदांना युडीआयडी प्रमाणपत्र पडताळणीचे आदेश दिले होते. जिल्हापरिषदेत झालेल्या शिक्षकांच्या पडताळणी प्रक्रियेत कनिष्ट प्रशासन अधिकारी पंकज गुल्हाने, प्रवीण जिचकार, अपंग कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षीत, वरिष्ठ सहायक सुनील गावंडे, कनिष्ठ सहायक विजय मालोकार,संजय वाघमारे, कनिष्ट प्रशासन अधिकारी रोशनी पाचघरे आदींचा सहभाग होता

# शेतकऱ्यांना १८,५०० रुपये प्रति हेक्टर थेट मदत मिळणार

## शेतकऱ्यांसाठी ही ऐतिहासिक नुकसान भरपाई : खा. डॉ. बोंडे



**विदर्भ प्रजासत्ताकदि.८अमरावती** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकयांसाठी ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले, ही नुकसान भरपाई न भूतो न भविष्यती ऐतिहासिक असल्याची प्रतिक्रिया भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोहे यांनी दिली. देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्यक्ष नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. नुसतीच पाहणी केली नाही तर शेतकऱ्याच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याचे काम केल्याचेही खा. डॉ. बोडे यांनी म्हटले आहे.शेठक-यांसाठी पंकज विषयी माहिति देताना खासदार डॉ. अनिल बोंडे म्हणाले, महाराष्ट्रातील पूखस्त शेतक-यांसाठी सरकारने आनंदाचे पॅकेज जाहीर केले. २५३ तालुक्यात ६५ मिलिमीटर पावसाचे कोणतेही निकष या मदतीमध्ये ठेवण्यात आले नाहीत. खरडून गेलेल्या जमिनीला ४७ हजार रुपये प्रति हेक्टर सोचत तीन लाख रुपयांची मदत नरेगामधून करण्यात येणार आहे. साडेतीन लाख रुपयांचा निधी जमीन दस्स्तीसाठी शेतक-यांना मिळणार आहे.कोरडवाहू शेतीला आजपर्यंत कधीही एवढे मोठे पैकेज मिळाले नाही, १८ हजार ५०० रुपये प्रति हेक्टर गाप्रमाणे शेतकऱ्याना भेट मदत मिळणार आहे. हंगामीबागायतीसाठी २७ हजार रुपये प्रति हेक्टर, बागायतीसाठी ३२ हजार ५०० प्रति हेक्टर, याशिवाय १७ हजार प्रति हेक्टर पिक विमा मिळणार आहे. एचदी मोठी नुकसान भरपाई आजपर्यंत कधीही कोणत्याही सरकारच्या काळात झाली नाही. १८ हजार कोटी रुपये प्रत्यक्ष पिकाच्या नुकसानीसाठी जाहीर करणारे देवेंद्र फडणवीस हे पहिलेच मुख्यमंत्री असल्याचेही डॉ. अनिल बोंडे यानी म्हटले आहे. राज्यातील संपूर्ण शेतकऱ्यांच्या वतीने त्यांना म्हणावे तेवढे आभार कमी आहेत.पूरग्रस्त, आपत्ती, संकट काळात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सपूर्ण सरकारनं महाराष्ट्रभर शेतक-यांच्या बांधावर जाऊन बेट मतीय कार्य हाती घेतल होत. ही मदत केवळ पाहणीपूर्तीच मर्यादित न राहता बेट त्यांना मिळणार आहे. या मदतीमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल असेही डॉ. अनिल बोडे म्हणाले.मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेली मदत ही शेतकरी, शेतमजूर, नुकसानग्रस्त क्षेत्र पडझड झालेली ठिकाण यासह सर्वच घटकांना दिलासा देणारी आहे, असेही खा.डॉ. अनिल बोंडे यांनी स्पष्ट केले आहे.

# राष्ट्रसंतांच्या विचारांपासून प्रेरणा घेत समाजासह राष्ट्र प्रगतीचे वाहक व्हावे:डॉ. पुरुषोत्तम पाळेकर

## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८गुरुकुं ज मोझरी-** महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा या युवकासांठीच असल्यामुळे त्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्याची व कार्याची जाणिव होणे महत्वाचे आहे. ४५ वर्षापासून या वक्तृत्व स्पर्धेतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचाराचा व्यापक प्रसार होत आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या व्यासपीठावरील वक्तृत्व स्पर्धा म्हणजे कर्तुत्वान माणसे निर्माण करण्याची कार्यशाळा आहे. महाविद्यालयीन युवकांनी महाराजांच्या विचारांपासून प्रेरणा घेवून समाज व राष्ट्राच्या प्रगतीचे वाहक व्हावे, असे अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे विश्वस्त प्रमुख डॉ. पुरुषोत्तम पाळेकर यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यतिथी महोत्सवा निमित्त श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालया अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. त्यावेळी ते अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. तत्पूर्वी, स्पर्धेचे परीक्षक म्हणुन ड सचिन महोकार, अमोल वाघमारे, ग्रामगीताचार्य अरविंद राठोड यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. या वेळी व्यासपीठावर श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य मुरलीधर खारोडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत पायमल्ले, डॉ दिगंबर निघोट, सहायक कार्यक्रम अधिकारी मंगेश कोल्हटकर, डॉ संतोष डोईफोडे, बक्षिस दाते रमेश बोबडे, डॉ. विनोद देशमुख, डॉ. माया गंधे, डॉ चारुता पार्लेवार, श्रीगुरुदेव शाळेचे मुख्याध्यापक मनोज कडु आदींची उपस्थिती होती. या राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत महाराष्ट्रातून स्पर्धक सहभागी झाले. सर्व सहभागी, विजयी स्पर्धकांना स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्रक व डॉ. जनसेवक जयस्वाल यांच्याकडून ग्रामगीता प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन कांक्षिणी नेव्हे, परिणीता धांडे यांनी केले.

# दर्यापुर तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री समितीची आमसभा, सभेत विविध निर्णय घेतले

## एमपीएससी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कारः



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८दर्यापूर-** एमपीएससी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रतिनिधी । दर्यापूर दि. दर्यापुर तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री समिती संस्थेची आमसभा संस्थेचे (कै.)भाऊसाहेब बारब्दे स्मृती शेतकरी सदन येथे झाली. संस्थेचे व्यवस्थापक राजेंद्र गावंडे यांनी संचालन करून संस्थेचा लेखाजोखा वाचन केले. दरम्यान संस्थेचे भागधरकांचे मुले महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये यशस्वी होऊन शासकिय नोकरीमध्ये नियुक्त झालेले देवव्रत ब्राम्हणकर, योगेश सावरकर, अनुज धोटे, सौरभ गावंडे या ४ जणांचा त्यांच्या आई-वडीलांसह सत्कार केला.संस्थेला नाफेडतर्फे राज्यातील उत्कृष्ट संस्था म्हणून केंद्रीय सहकार मंत्री अमीत शहा यांच्या तर्फे केंद्रीय पुरस्कार मिळाल्याबाबत संस्थेचे अध्यक्ष गजानन जाधव, उपाध्यक्ष प्रभाकर कोरपे व संचालक मंडळाचा संस्थेचे भागधारकांतर्फे सत्कार करण्यात आला. या आमसभेकरीता खासदार बळवंत वानखडे, तज्ज्ञ संचालक सुधाकर भारसाकळे, बाळासाहेब हिंगणीकर, श्रीरंग अरबट, अरूण गावंडे, विक्रमसिंह परिहार, कृउबा सभापती सुनिल गावंडे, उपसभापती राजु कराळे, कृउबा संचालक कांचनमाला गावंडे, गजानन देवतळे, राजेश बारब्दे, साहेबराव भदे, किशोर गणोरकर, अभय गावंडे, अनिल भारसाकळे, राजा गायगोले, ईश्वर बुंदीले, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष गजानन जाधव, प्रभाकर कोरपे, मधुसुदन पाचे, संजय चांदुरकर, भय्या टेकाडे, अमोल देशमुख, संतोष भोंडे, तुळशिराम टोळे, अमोल धर्माळे, प्रा.डॉ. सुशिल गावंडे, दिनकर गायगोले, मदन बायस्कार, राजेंद्र नागपुरे, कैलास अघडते, प्रशांत देशमुख, संचालिका रेखा गावंडे, वर्षा ब्राम्हणकर, दर्यापूर व अंजनगाव तालुक्यातील संस्थेचे सर्व मान्यवर सभासद व तालुक्यातील सेवा सहकारी सोसायटीचे सर्व प्रतिनिधी उपस्थित होते. सभेचे संचालन संस्थेचे व्यवस्थापक राजेंद्र गावंडे व आभार संस्थेचे सचिव मधुसुदन पाचे यांनी केले. संस्थेच्या परिसरात विविध कंपन्याचे स्टॉल लागले होते. या वेळी उपस्थितांनी संस्थेच्या विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन केले. जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी बाबत शासनाकडे शेतकऱ्यांना मदत मिळावी, या करीता ठराव मांडला व देशाचे पहिले कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांना भारतरत्न मिळावा. हा ठराव मांडला याबाबत भागधारकांनी मंजुरी दिली. माती परीक्षण करून देण्याकरीता सोय सहकारी संस्थेचे विकास होण्या करीता भारतातून दर्यापुर खरेदी विक्री संघाची विदर्भ विभागातून निवड केली आहे. संस्थेने शेतक-यांचे माती परीक्षण करुन देण्या करीता आरसीफ, इफको, कृभको इत्यादी संस्थांन कडून माती परीक्षण करून देण्याकरीता सोय केली. शेतक-यांनी माती परीक्षणाकरीता संस्थेच्या कार्यालयात आणून दिल्यास माती परीक्षण अहवाल घरपोच करून देण्याबाबत सोय करुन दिली आहे.

# शेतकऱ्यांचे ज्वारीचे २ कोटींचे देय थकले १३० शेतकरी पाच महिन्यांपासून प्रतीक्षेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अचलपूर**

तालुक्यातील शेतकऱ्यांचे ज्वारीचे दोन कोटी रुपये शासनाकडे थकीत असून सदर रक्कम शेतकऱ्यांना तत्काळ द्यावी, अशी मागणी ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.

३ हजार ३७० रू. प्रति क्विंटल याप्रमाणे शासकीय हमीभावावर तालुक्यातील ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांची ज्वारी शासनाने खरेदी केली. मात्र ११ जून २०२५ पासून शासनाने १३० शेतकऱ्यांच्या खात्यात ज्वारीची रक्कम जमा केली नाही

शेतकऱ्यांच्या मालाची खाजगी व्यापाऱ्यांकडून आर्थिक लूट होऊ होऊ नये नये म्हण म्हणून शासनाने



ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांकडून हमीभावावर ज्वारी खरेदीचे धोरण ठरवले. चांगला भाव मिळेल, या आशेने शेतकऱ्यांनी ज्वारी शासनाला विकली. सदर शासकीय खरेदी ही तालुका खरेदी-विक्री संस्थेच्या माध्यमातून करण्यात आली. खरेदी विक्री संस्थेने सर्व सोपस्कार पूर्ण केले. त्यामुळे सदर दोन कोटी रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणे गरजेचे होते. मात्र पाच महिन्यांचा कालावधी उलटूनही शेतकऱ्याना अद्यापरक्कम मिळाली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी खरेदी-विक्री संस्थेत अनेक वेळा चकरा मारल्या. त्या अनुषंगाने संस्थेने अनेक वेळा अमरावती येथील जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांना पैशाची केली. वारंवार

या संदर्भात जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालयाला पैसे पाठविण्याबाबत मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये लवकरच पैसे टाकले जाईल, असे जिल्हा मार्केटिंग कार्यालयाने सांगितले आहे.

**संतोष चित्रकार व्यवस्थापक, खरेदी-विक्री संस्था अचलपूर.**

संस्थेकडून पाठपुरावाही मागणी करण्यात आला: मात्र तरीसुद्धा कुठलाच फायदा झाला नाही.सद्यस्थितीमध्ये सततच्या पावसामुळे शेतकरी अतिशय संकटात सापडला आहे. पावसामुळे सोयाबीनला कोंब फुटले आहे, संत्रा फळे जमीनदोस्त झाली आहे, कपाशीला बोंडे नाहीत, मोठ्या प्रमाणात पातीगळ झाली आहे. कुठल्याच कृषी मालाला भाव नाही, अशा अनेक संकटांनी शेतकऱ्याला घेरलेले आहेत.शेतकऱ्यांनी बँका आणि खाजगी सावकारांकडून कर्ज घेतली आहे. कर्जाचा भार शेतकऱ्यांच्या डोक्यावर दिवसेंदिवस वाढत आहे; मात्र शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे शासन देत नसल्याने या संकटात अधिकच भर पडली आहे.

दिवाळी तोंडावर आहे. दिवाळीपूर्वी शासनाने ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांचे पैसे द्यावे, अशी मागणी आहे, अन्यथा शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात होणार असल्याच्या शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या आहे.

# चांदुर ढोरे ते भारवाडी रस्त्याची दयनीय अवस्था

## रस्ता दुरुस्ती साठी तिवसा तहसीलदार यांना निवेदन सादर : मागणी पूर्ण न झाल्यास नागरिक व विध्यार्थी यांचा आक्रमतेचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८तिवसा**

तिवसा तालुक्यातील चांदुर ढोरे व भारवाडी रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे.रस्त्या मध्ये मोठ मोठे खड्डे पडले असून रस्त्याची चाळण झाली आहे.या गावातील नागरिकांचे मत आहे की.रस्त्यात खड्डे आहे की खड्यात रस्ते आहे. हा रस्ता चांदुर ढोरे या गावाचा प्रमुख रस्ता आहे.हे गाव आसरा देवी मंदिर तीर्थक्षेत्र आहे.या गावात लाखो भक्त दर्शनासाठी येतात.या रस्त्यामध्ये दुहेरी वाहतूक करणे कठीण झाले आहे.या रस्त्यावर स्थानिक भूमिपुत्र,शेतकरी,विध्यार्थी व भाविक भक्त यांची वर्दळ असते. एस टी बस फेरी मंजूर असून सुद्धा रस्त्यामुळे सुरु झाली नाही असून या गावातील शाळेत जाण्यासाठी विलंब होतो.चांदुर ढोरे येथील नागरिकांनी मत व्यक्त केले की,जी.प.प्रशासनाने हा रस्ता झाला तेव्हा पासून या रस्त्यावर डागडुजी साठी एकही रुपया खर्च केला नाही असून ह्याची सखोल चौकशी व्हावी.मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून प्रस्तावित असून सुद्धा अजूनपर्यंत मंजूर झाला नाही असे गावातील नागरिकांनी यावे मत व्यक्त केले.यावेळी गावातील माजी सरपंच विलास हांडे यांनी पुढाकार घेऊन तिवसा तहसीलदार मयूर कडसे यांना निवेदन सादर केले.चांदुर ढोरे येथील ग्रामस्थ,शेतकरी व विध्यार्थी यांनी मागणी पूर्ण झाल्यास आक्रमतेचा इशारा देण्यात आला आहे.

# आरक्षणातून महिलांना बळ; चिखलदऱ्यात दहा जागा महिलांसाठी नगर पालिकेचे वार्ड निहाय आरक्षण जाहीर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८ चिखलदरा**

नगरपालिकेची आरक्षण सोडत २०२५ ची जाहीर झाली असून चिखलदरा नगरपालिकेत दहा प्रभाग पाडण्यात आलेले आहेत. यामध्ये एकूण २० नगरसेवकांसाठी ही निवडणूक होणार आहे. प्रत्येक प्रभागात दोन नगरसेवकांसाठी ही निवडणूक होईल. वीस जागेपैकी १० या महिलांसाठी राखीव झालेला आहेत.

चिखलदरा नगरपालिकेची आरक्षण सोडत उपजिल्हाधिकारी विवेक जाधव यांच्याप्रमुख उपस्थितीत काढण्यात आली असून यावेळी चिखलदराचे तहसीलदार जीवन मोरणकर,चिखलदरा नगरपालिकेचे मुख्य अधिकारी तथा प्रशासक धीरज गोहाड उपस्थित होते. या सर्व चिखलदराशहरातील सर्वच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारी ४ वाजतापासून आरक्षण सोडत करण्यात आली आहे.यामध्ये प्रभाग क्रमांक १ अनुसूचित जमाती सर्वसाधारण व सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक दोन अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागास प्रवर्ग, प्रभाग क्रमांक तीनअनुसूचित जमाती सर्वसाधारण, सर्वसाधारण. प्रभाग क्रमांक चार अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागास प्रवग, प्रभाग क्रमांक ५ अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमाक ६ अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ७अनुसूचित जाती सर्वसाधारण व नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, प्रभाग क्रमांक ८ अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला.जमाती व प्रभाग क्रमांक ९ अनुसूचित सर्वसाधारण नागरिकांचामागास प्रवर्ग महिला, प्रभाग क्रमांक १० अनुसूचित जमाती महिला व सर्वसाधारण असे आरक्षण निघाले असून नगराध्यक्षासाठी सर्वसाधारण निघाल्यामुळे सगळीकडे आनंदाचे वातावरण आहे. चिखलदरा नगरपालिकेची निवडणूक ही चुरशीची होणार आहे.

# डोंगराळ भागातील सीताफळांमुळे अनेक कुटुंबांना मिळतोय रोजगार

## विक्रीसाठी परिसरातील बाजारात दाखल होत आहे



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८पथ्रोट**

सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या डोंगराळ भागात सीताफळ बागा नदीकाठी व माळरानावर मोठ्या प्रमाणात असून, रसाळ व मधाळ सीताफळघेण्याची संधी नागरिकांना मिळत आहे. हे सीताफळे विक्रीसाठी परिसरातील बाजारात दाखल झाले असून याचा आस्वाद घेण्यासाठी शहरी भागातील लोक खरेदी करत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.रानोमाळ भटकंती करत सीताफळ गोळा करून कुटुंबांना आधार दिला जातो. यामुळे गोरगरीब मजुरांना रोजगार मिळत असतो व पोटाची खळगी भरण्यासाठी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठीविक्रीसाठी परिसरातील बाजारात दाखल होत आहे असलेल्या या भागात नैसर्गिक सीताफळाचे झाडे आहेत.अनेक ठिकाणी काही मजूरदार लोक सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या डोगरी भागात व दरी कपारी डोंगरी भागात या नैसर्गिक सीताफळाचा शोध घेऊन ते गोळा करत आहेत. आपल्या घामाचा दाम या सीताफळाच्या विक्रीतून त्यांना मिळतो व त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. त्यांच्यावर सातपुड्याच्या पायथ्याशी शेतकऱ्यांनी नवीन सीताफळाची लागवड केली आहे. त्यामुळे ही रसाळ मधाळ सीताफळांचा आस्वाद घेण्याची गोडी नागरिकांना लागली आहे. एक डालभर सीताफळे केवळ शंभर ते दोनशे रुपयांना विकली जातात. त्यामुळे बाजारात विक्रीसाठीही सीताफळे दाखल झाले असून, नागरिक मोठ्या येत आहेत. प्रमाणात खरेदी करतांना दिसून येत आहे.

# सदाशांती बालगृहातील तिन अनाथ मुलींचा शाही विवाह

## कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्रा. डॉ. श्वेता बारहाते, गोपाल पांडे, अमृता पांडे, वसंत बेलोकार, कविता बेलोकार या दांपत्यानी केले कन्यादान



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

बहुद्देशीय आरोग्य समाज कल्याण संस्थेव्दारा स्थानिक विद्यापीठ मार्गावरील वृंदावन कॉलनीत कार्यरत असलेल्या आधारगृहातील तीन अनाथ मुलीचे ५ सप्टेंबरला अत्यंत शाही पद्धतीने मान्यवरच्या उपस्थितीत संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. पी. इंगळे, सचिव कुमुदिनी इंगळे, संचालक प्रा. पंकजा इंगळे (पळसोदकर), संजय पळसोदकर, डॉ. जयेश इंगळे, सुमित्राताई जामनिक यांनी लग्न लावून दिले. या लग्न सोहळ्याला प्रमुख उपस्थित खा. बळवंत वानखडे, पोलिस आयुक अरविंद चावरिया, कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, सहायक जिल्हाधिकारी अंकुशकुमार धर्माधिकारी, अप्पर राज्यकर आयुक्त तेजराव पाचारणे, सहायक आयुक्त भाऊराव चव्हाण, सहा आयुक्त प्रांजली बारस्कर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कैलास घोडके, डिजिएम श्रीकात ढगे, माजी सहसंचालक रवींद्र घुलते, सुनील राणा, नानकराम नेभनाणी, रुपेश देशमुख उपस्थित होते.

वाजतगाजत नरदेवांचे लग्न मंडपात आगमन होताच लग्न सोहळ्याला सुरुवात झाली. यावेळी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते व त्याच्या सहचारिणी प्रा. डॉ श्वेता बारहाते तसेच उद्योजक गोपाल पांडे, अमृता पांडे,वसंत बेलोकार, कविता बेलोकर या दाम्पत्यांनी मंगला, रजनी, लक्ष्मी या तीन मुलीचे कन्यादान केले. त्यानंतर लग्न विवाहसोहळा अत्यंत आनंदात पार पडला. यावेळी नववधूंना भेट स्वरुपात वस्तू देण्यात आल्या. या कार्यक्रमात जी मंडळी बालगृह तसेच आधारगृहाला मदतीची हात देते, त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी संभाजीनगर विभागाचे सहायक जिल्हाधिकारी अंकुशकुमार धर्माधिकारी यांनी बालगृहातील मुलीना आपण आपल्या परीने सहकार्य करण्याचा प्रयत्न करू, अशा भावना व्यक्त केल्या. समाजसेवक नानकराम नेभनानी यांनी दर महिन्याला बालगृहात येऊन मुलींच्या अडीअडचणी आपण जाणून घेऊ आणि कुठलीही मदत लागल्यास करू, तसेच निराधार मुलीच्या लग्नाकरिता खर्च मिळाला पाहिजे म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर हा प्रश्न मांडू, असे ते म्हणाले.यावेळी सुनील राणा यांनी नव दाम्पत्यांना शुभेच्छा देत आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पंकजा इंगळे यांनी केले तर कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन श्रीप्रा मानकर यांनी केले कार्यक्रमाला प्रामुख्याने डॉ. उषा गजभिये,डॉ. भूपेश भोंड, डॉ. लक्ष्मी भोड, डॉ. कविता सोळ्के, डॉ. अमित निंभोरकर, डॉ. स्वप्नजा निंभोरकर, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड सपना जाधव, बाल संरक्षण अधिकारी अजय डबले, ॲड. संध्या वानखडे, वैशाली चौरे, नारायण गाडगे, सुशील डोंगरदिवे, चंद्रकांत पोपट, मनोज बक्तार, विजय गायकवाड, भूषण कावरे, प्रशांत विघ्ने आदीसह अनेक जण उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता अंकुर डवरे, पवन राऊत, राहुल राजपूत, सुचिता, वैद्य, विलास तुपाडे, सुनीता आठवले, पवार यांनी प्रयत्न केले.

# अचलपूर उपविभागातील ७४ लाथार्थ्यांना मिळाले घरकुल

## अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यात १२४९ प्रमाणपत्राचे वाटप सेवा पंधरवडा, विविध उपक्रमातून समस्यांचा निपटारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८चांदूर बाजार**

शासकीय योजनेपासून वंचित राहणाऱ्या तसेच गरजू लाभार्थ्यांसाठी ७४ शासनाचा सेवा पंधरवडा आशादायी ठरला आहे. या सेवापंधरवड्यात अचलपूर उपविभागात तब्बल लाभार्थ्यांना हक्काचा निवारा मिळाला आहे. तर १७९२ लाभार्थ्यांना लाभ मिळाला, तसेच २६ गावातील स्मशानभूमी जागेचा प्रस्ताव पाठवण्यात आला असून लवकरच त्या गावांनाही स्मशानभूमीकरिता जागा मिळणार आहे. प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत शासकीय योजना पोहचवण्यासह नागरिकांच्या समस्या मार्गी लावण्याचे काम सुरू असल्याचे उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी सागितले.



याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजस्व अचलपूर महाराज अभियानातंर्गत उपविभागातील चांदूरबाजार व अचलपूर या दोन्ही तालुक्यात ७८४ शासनाच्या सेवा पंधरवड्यात तब्बल १२४९ विविध प्रमाणपत्रे व दाखले लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले. यामध्ये अचलपूर ४६५ तर चांदूरबाजार तहसील अंतर्गत प्रमाणपत्रे, दाखल्यांचा समावेश असुन २० लाभार्थ्यांना पट्टे वितरित करण्यात आले असून तर तीन लोकांचे प्रस्ताव सादर करण्यात आले. उपविभागात २३९० रस्ते नोंदवण्यात आले असून नकाशावर नसलेले ७४५ रस्ते नोंदवण्यात आले आहे.यावेळी उपविभागातील १३८ गावांमध्ये ग्रामसभा घेण्यात आल्या असून ३५७गावांमध्ये शिवार फेरी काढण्यात आली. ७४ लाभार्थ्यांना हक्काचा घरकुलाचा लाभ मिळाला आहे. १३ पांदण रस्ते अतिक्रमण मुक्त करून सीमांकन करून दुतर्फा झाडे लावण्यात आली. ४४ मय्यत खातेदारांचे सातबारावरील वारसांचे नाव चढवून सातबारा जिवंत करण्यात आले अचलपूर उपविभागात महाराजस्व अंतर्गत १३ शिबिरे विविध गावांमध्ये घेण्यात आली आहे.विमुक्त जाती व भटक्या जमाती लाभार्थ्यांसाठी योजना, आले. १७९२ लाभार्थ्यांना लाभविशेष शिबीर घेण्यात मिळाला असून अजूनही लाभार्थ्याचे कामे वेगाने सुरू आहेत. उपविभागात प्रत्येक उपक्रम व कार्यक्रमात नागरिकांचा सहभाग व उपस्थिती मोठ्याप्रमाणात होती.

# विद्यापीठात फिरत्या वाचनालय प्रदर्शनीचे कुलगुरूंच्या हस्ते उद्घाटन; भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय व नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर पुस्तक महोत्सवाचे दि. २२ ते ३० नोव्हेंबर, २०२५ या दरम्यान रेशीम बाग, नागपूर येथे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी फिरत्या वाचनालय प्रदर्शनी बसचे बुधवार दि. ८ ऑक्टोबर रोजी विद्यापीठात आगमन झाले. यावेळी कुलगुरू



डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. निलेश कडू यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी फिरते वाचनालय प्रदर्शनीचे निरीक्षण करतांना प्रदर्शनीमध्ये असलेल्या विविध पुस्तकांबाबत जाणून घेतले. सदर बस ही ८ व ९ ऑक्टोबर असे दोन दिवस अमरावती शहरातील विविध महाविद्यालयांना भेट देणार आहे. तरी सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी या फिरते वाचनालय प्रदर्शनी बसला भेट द्यावी आणि पुस्तकांची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात आले आहे.

# अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोल्यात होणार, जागेची शोधशोध

## उपकेंद्र एखाद्या महाविद्यालयामध्ये सुरू करण्याच्या दृष्टीने चाचपणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अकोला**



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोल्यात सुरू करण्याला मंजुरी दिली आहे. त्याची उभारणी करण्यासाठी जागेचा शोध घेऊन प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या आहेत. तात्पुरत्या स्वरूपात हे उपकेंद्र एखाद्या महाविद्यालयामध्ये सुरू करण्याच्या दृष्टीने देखील चाचपणी केली जात आहे.

अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोल्यात सुरू करण्यासंदर्भात मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यावेळी भाजप प्रतोद आ. रणधीर सावरकर उपस्थित होते. अमरावती विद्यापीठाचे कार्यक्षेत्र व प्रशासनाचा व्याप लक्षात घेता अकोल्यात उपकेंद्र सुरू करण्याची जुनीच मागणी आहे.

या संदर्भात आमदार रणधीर सावरकर अनेक वर्षांपासून सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्यावर मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरूंना प्रस्ताव तातडीने शासनास सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोला, बुलढाणा व वाशीम जिल्ह्यासाठी सोयीस्कर होणार आहे. विद्यापीठांतर्गत ४४१ महाविद्यालयांपैकी २२१ महाविद्यालये तसेच ४५ टक्के विद्यार्थी संख्या या तीन जिल्ह्यांमध्ये आहे. बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील महाविद्यालयाचे अमरावतीपर्यंतचे अंतर २०० कि.मी. पेक्षा जास्त आहे.

विद्यापीठ कामासाठी वारंवार अमरावतीला जाणे महाविद्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी व पालकांसाठी प्रचंड गैरसोयीचे व आर्थिक भुर्दंड बसणारे ठरत आहे, असे मुद्दे आ. सावरकर यांनी बैठकीत उपस्थित केले. त्यावर मंत्री चंद्रकांत पाटील अकोला येथे उपकेंद्रासाठी जागा शोधण्याच्या सूचना केल्या. उपकेंद्र तातडीने सुरू करण्यासाठी एखाद्या महाविद्यालयाचा पर्याय देखील सादर करण्याचे त्यांनी सांगितले.उपकेंद्र सुरू करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर पुढील कार्यवाही व आराखड्यासाठी तीन अधिकाऱ्यांची समिती तयार करावी, येत्या मंगळवारपर्यंत उच्च व तंत्र शिक्षण कार्यालयास प्रस्ताव सादर करण्यात यावा, आदी सूचना मंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना न्यायासाठी तिवसामध्ये शिवसेना (ऊबाठा) आणि शेतकऱ्यांचे निवेदन आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ तिवसा**

तिवसा तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी, शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे व विमा रक्कम तत्काळ खात्यात जमा करावी या मागण्यांसाठी आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या वतीने तिवसा तहसीलदार मयूर कळसे यांना निवेदन सादर करण्यात आले.



**या निवेदनात प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे मांडण्यात आल्या:**

अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीसाठी शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ५०,००० थेट आर्थिक मदत जाहीर करावी.महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देण्यात यावी.

पीक विमा मिळवण्यासाठीचे निकष शिथिल करून पंचनाम्याशिवाय विमा रक्कम त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी.अतिवृष्टीमुळे झालेल्या घरे व पशुधन नुकसानीसाठी जुने निकष न लावता त्वरित मोबदला द्यावा.शिवसेना (ऊबाठा) तालुका प्रमुख विलास माहुरे यांनी सरकारवर टीका करताना सांगितले की, विधानसभा निवडणुकीदरम्यान दिलेली सरसकट कर्जमाफीची आश्वासने अद्याप पूर्ण झालेली नाहीत, त्यामुळे शेतकरी अजूनही संकटात आहेत.शेतकऱ्यांवर आज नैसर्गिक आपत्ती, उत्पादन खर्चातील वाढ, खते-औषधांची महागाई, हमीभावाच्या अभावामुळे आर्थिक संकट ओढावले आहे. अनेक शेतकरी बँक व सावकारांच्या कर्जामुळे त्रस्त असून थकबाकी वसुली, नोटीसा, जप्ती कारवाई यामुळे आत्महत्या करण्यासही भाग पडत आहे.या पार्श्वभूमीवर सरसकट कर्जमाफी हीच एकमेव प्रभावी उपाय योजना असल्याचे निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. यामध्ये सर्व प्रकारचे – थकबाकीदार, चालू, अल्प-मुदतीचे, सिंचन, शेडनेट, दुध व्यवसायाशी संबंधित, तसेच सावकारी कर्जाचाही समावेश करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली.या आंदोलनात शिवसेनेचे पदाधिकारी देविदास निकाळजे, अनिल कायंदे, सुभाष केवतकर, सागर रावणकर, किसन इंगोले, राहुल केणेकर, राजू सुलतान आणि तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमरावती महापालिकेला ई बस डेपो चार्जिंग सुविधेसाठी बडनेरा येथे जमीन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**



अमरावती महापालिकेला केंद्र शासन पुरस्कृत पंतप्रधान ई बस योजनेतून मिळालेल्या ई-बस डेपो व चार्जिंग सुविधेसाठी मौजा बडनेरा येथील २ हेक्टर ३८ आर जमीन ३० वर्षांसाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

केंद्र पुरस्कृत पंतप्रधान ईलेक्ट्रिक बस योजनेंतर्गत अमरावती महापालिकेने ई-बस डेपो व चार्जिंग करिता जमिनीची मागणी केली होती. त्यानुसार बडनेरा येथील सर्व्हे क्र. ११० मधील २.३८ हेक्टर आर शासकीय जागा भोगवटदार वर्ग-२ म्हणून महापालिकेला ३० वर्षासाठी मोफत देण्यात येणार आहे. यामुळे अमरावती महापालिकेला ई-बस आणि त्यांच्या चार्जिंगसाठी व्यवस्था निर्माण करता येणार आहे. यामुळे नागरिकांसाठीच्या दर्जेदार प्रवास सुविधेत भर पडणार आहे.

# शासन पॅकेजचा चार लाख हेक्टरला लाभ; अतिवृष्टीचा निकष बाद, वाढीव दराने मिळणार मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**



सततचा पाऊस, अतिवृष्टीनेजिल्ह्यात सार्वत्रिक नुकसान झाले असताना फक्त अतिवृष्टीने बाधित १.२४ लाख हेक्टरलाच १०८ कोटींची मदत मिळाली व उर्वरित शेतकरी प्रतीक्षेत राहिले आहे. आता बाधित शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासनाने वाढीव दराने मदतीचा निर्णय मंगळवारी घेतला. त्यामुळे किमान चार लाख हेक्टरला मदत मिळण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने सांगितले.जून ते ऑगस्टदरम्यान ३३ टक्क्यांवर नुकसान झालेल्या १,६८,५३३ शेतकऱ्यांच्या बाधित १,२३,७६३ हेक्टरला प्रचलित 'एनडीआरएफ'च्या निकषाने १०८.७१ कोटींची मदत देण्यात आली. मात्र, ही मदत फक्त अतिवृष्टीने बाधित पिकांसाठी आहे व यामध्ये सततच्या पावसाने नुकसान झालेले शेतकरी वंचित राहिले होते.

सध्या बाधित शेतकऱ्यांच्या याद्या करण्याचे काम सुरू आहे. शासनादेश लगेच येण्याची शक्यता आहे. यानुसार वाढीव निकषाने अधिकाधिक शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी शासन मदत मिळण्याची शक्यता आहे. अशी माहिती अनिल भटकर,निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दिली.

# सूर्यकांत नाव आहे, सूर्याचा प्रकाश तरी येऊ द्या!

## सुप्रीम कोर्टाच्या सुनावणीवर खासदार अरविंद सावंत यांची प्रतिक्रिया



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

शिवसेना (ठाकरे गट) चे ज्येष्ठ नेते व खासदार अरविंद सावंत यांनी आज अमरावतीत सुप्रीम कोर्टाच्या शिवसेना पक्ष संबंधित सुनावणीवर तीव्र प्रतिक्रिया दिली. त्यांनी सांगितले की, नाव सूर्यकांत आहे, किमान सूर्याचा तरी प्रकाश आमच्यावर पडू द्या. आशेचा झरोका आमच्या खिडकीतून यावा, असं आम्हाला वाटतं.

सावंत पुढे म्हणाले, संविधान, कायदा आणि नियमानुसारच निर्णय व्हावा. तो न्याय आम्हाला मिळावा, हाच आमचा हक्क आहे. न्याय मिळालाच पाहिजे. चिन्ह गोठवलं तरी चालेल, पण ते आधीच गोठवायला हवं होतं. 'नाव' तर नक्कीच द्यायला नको होतं. माझ्या बापाचं नाव दुसऱ्याला देणार का? अशी रोखठोक भावना त्यांनी व्यक्त केली.

त्यांनी सांगितले की, चिन्ह आणि नाव दोन्ही आमचेच आहेत. आम्ही घरात आहोत, ते घर सोडून गेले. त्यामुळे त्यांचं सदस्यत्वच रहायला नको. इतिहासाला काळिमा फासणारी ही घटना आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाची ही थेट धज्जी उडवणारी कृती आहे.

यांचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे वेगळे, अशा शब्दात त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

**मुंबई मेट्रो उद्घाटन सोहळ्यात अनुपस्थित राहणार**
**पश्चिम विदर्भातील दौऱ्यावर भर**

मुंबई मेट्रोच्या उद्घाटन सोहळ्यात गैरहजर राहण्याबाबत बोलताना खासदार अरविंद सावंत म्हणाले, आज संपूर्ण महाराष्ट्रभर शिवसेना (ठाकरे गट) चं आंदोलन सुरू आहे. मी सध्या पश्चिम विदर्भ दौऱ्यावर आहे – बुलढाणा, अकोला, अमरावती येथे विधानसभा निहाय बैठका घेतोय.

ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांच्या आंदोलनावर लक्ष आहे. जिल्हा परिषद व महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तयारी सुरू आहे, त्यामुळे मी मुंबईतील कार्यक्रमाला जाणार नाही. हा दौरा पूर्वनियोजित असल्याचे ते म्हणाले.

# एमपीएससीच्या ९३८ पदांच्या जाहिरातीवर विद्यार्थी नाराज ?

## सरकारने तोंडाला पाने पुसल्याचा विद्यार्थ्यांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**




महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) ९३८ पदांसाठी महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा २०२५ घेतली जाणार आहे. ४ जानेवारी रोजी राज्यातील ३७ जिल्हा केंद्रांवर ही परीक्षा घेतली जाणार असून, उमेदवारांना ७ ऑक्टोबरपासून अर्ज भरता येणार आहेत. मात्र या जाहिरातीवरून उमेदवार आणि अनेक विद्यार्थी संघटन मध्ये प्रचंड नाराजीचे वातावरण आहे. जाहिरातीमधून मोटर वाहन निरीक्षक पदच गायब आहे.

याशिवाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच मेगा भरतीची घोषणा केली असताना केवळ ९०० पदांसाठी जाहिरात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे. एमपीएससीने महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा २०२५ची जाहिरात प्रसिद्ध केली. या पूर्वी महाराष्ट्र गट ब सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा २०२५ची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यामुळे गट कअंतर्गत किती पदांची जाहिरात प्रसिद्ध केली जाणार, याकडे उमेदवारांचे लक्ष लागले होते. एमपीएससीने प्रसिद्ध केलेल्या गट क सेवा संयुक्त पूर्वपरीक्षेच्या जाहिरातीनुसार उद्योग निरीक्षक पदाच्या ९ जागा, तांत्रिक सहायक पदाच्या ४, कर सहायक पदाच्या ७३, तर लिपिक टंकलेखक पदाच्या ८५२ जागा भरण्यात येणार आहेत.


त्यासाठी उमेदवारांना ७ ते २७ ऑक्टोबर या कालावधीत अर्ज भरता येणार आहे. बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्यासाठी २९ ऑक्टोबर, तर परीक्षा शुल्क बँकेत भरण्यासाठी ३० ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

# धान्यात कीडनाशक अन् गोळ्या ठेवणे घातक

## रसायने असतात अपायकारक: नैसर्गिक वापर ठरतोय हिताचा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

धान्यात वापरल्या जाणाऱ्याकीडनाशक पावडरच्या रासायनिक प्रक्रियेतून गॅस तयार होऊन विषबाधा झाल्याने दोन लहान मुलांचा बळी गेल्याची हृदयद्रावक घटना अहिल्यानगर येथे घडली.



ग्रामीण भागात गहू, तांदूळ,कडधान्य वर्षभर टिकवण्यासाठी बोरिक पावडर आणि सेल्फॉसेसारख्या गोळ्यांचा वापर होतो. मात्र, या रसायनांचा असुरक्षित वापर निष्काळजीपणाचा कळस गाठतो आणि कळत-नकळतपणे मानवी जीवनासाठी मोठा धोका निर्माण करतो. ही रसायने जीवघेणी असल्याने त्यांच्या वापराबद्दल तज्ज्ञांचा सल्ला घेणे आणि त्यावर नैसर्गिक उपाय करणे मानवी आरोग्याच्यादृष्टीने गरजेचे आहे.

**या कीडनाशकांचा सर्रास होतो वापर**

धान्य टिकविण्यासाठी महिलावर्ग बोरिक पावडर, पांढरी पावडर, बोरिक ॲसिड आदी रसायनांचा वापर करतात. धान्यामध्ये विषारी अंश राहणे, ईडीसीटी मिश्र, इंजेक्शन/धुरी, इथेलिन डायक्लोराइड आणि कार्बन टेट्राक्लोराइड, धुरी पद्धत, गॅसमुळे श्वसनमार्गाला धोका होतो.

**सेल्फॉसमध्ये असतातजहाल विषारी तत्त्वे**

सेल्फॉस हे एक व्यावसायिक धुरीकरण कीडनाशक असून ते प्रथमोपचार न मिळणाऱ्या परिस्थितीत त्वरित जीवघेणे करण्याची शक्यता असते.

# आजीच्या हातचा फराळ – परदेशातही घरच्या प्रेमाची ओळख

## पोस्टात बुकिंग सुरू : पदार्थ जाणार सुरक्षित, पॅकिंगही करून मिळणार

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**





भारतीय टपाल विभागाने दिवाळीनिमित्त तब्बल १९२ देशांत 'फराळ पार्सल सेवा' सुरू केली आहे. यामध्ये देशातील कोणताही नागरिक परदेशातील आप्तस्वकीयांना दिवाळी फराळ अत्यंत माफक दरात पाठवू शकतो. यासाठी टपाल विभाग सज्ज झाला असून, फराळ पोहचविण्याची यंत्रणा सुरू झाली आहे. पार्सल पॅकिंग आणि बुकिंगची सुविधा मुख्य टपाल कार्यालयात उपलब्ध आहे. परदेशात, तसेच देशभरात टपाल विभागाच्या माध्यमातून फराळ पाठविण्याची सेवा उपयुक्त ठरत आहे.पार्सलचे वजन, ते ज्या ठिकाणी पाठवायचे आहे तेथपर्यंतचे अंतर, निवडलेला वाहतूक सेवा प्रकार यानुसार दर निश्चित करण्यात आले आहेत. मुख्य टपाल कार्यालयात पार्सल पॅकिंग करून सुविधा उपलब्ध आहे. त्याचे नाममात्र शुल्क असते. नागरिकांना पार्सल पाठविताना संपूर्ण मार्गदर्शन मिळत आहे.

**विविध १९२ देशांत 'फराळ पार्सल सेवा'**

टपाल विभागाच्या वतीने ऑस्ट्रेलिया, जर्मनी, इंग्लंड, चीन, यूएई, रशिया यांसह जगातील १९२ देशांत दिवाळीचा फराळ पाठविण्यात येतो. देशातील विविध शहरांमध्ये देखील पाठविता येणार आहे.

**अमेरिका, कॅनडातील पार्सल सेवा बंद**

दिवाळीनिमित्त शहर-जिल्ह्यातून अमेरिकेला दिवाळी फराळ पाठविण्यात येतो. मात्र, यंदा भारत सरकारने अमेरिका व कॅनडामध्ये पाठविण्यात येणारी सर्व प्रकारची पत्र, पार्सल सेवा सध्या तरी स्थगित केली आहे. दोन्ही देशांतील सेवा स्थगित करण्यामागे वेगवेगळी कारणे आहेत.

# कृष्ण महाराज धनी अवधूताच्या नामघोषणेने कौंडण्यपूर दुमदुमले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८कुऱ्हा**

तिवसा तालुक्यातील रुक्मिणी मातेचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र कौडण्यपूर येथील अवधुत महाराज श्री चतूर्पती संस्थानमध्ये अवधुत भक्तांची मांदियाळी पाहायला मिळाली.

विजयादशमीच्या पावन पर्वांच, परंपरेने चालत आलेल्या संत परंपरेतील एक अग्रणी श्री संत अवधुत महाराज यांच्या पवित्र समजल्या जाणाऱ्या झेंड्याच्या पूजन सोहळ्याचे यावर्षीही दस-याला अवधुत महाराजांच्या पालखीची शोभायात्रा कौडण्यपुर काढण्यात आली. त्यानंतर भजन, पूजनाने परिसर भक्तिमय झाला होता, हा सोहळा पाहण्यासाठी गावागावातून मोठ्या संकोने अवधुत महाराजांचे अनुयायी महिला, पुरुष मंडळी उपस्थित होते. चतूर्मती संस्थांचे सर्व विश्वस्त रामदास नीवल, संस्थानचे सचिव तथा शिवसा पंचायत समितीचे माजी सभापती विलास माहूरे, वसंत लोखंडे, श्रीकृष्ण काळबांडे, हरिभाऊ खारकर, अनिल गणोरकर, कैलाश कुबडे, प्रकाश बेलसरे, संदीप निवल, जानराव मनवरे, किसन राऊत, दादाराव बोटे, शरद वानखडे यांच्या सोबत भाविक या सोहळ्याला उपस्थित होते.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत